रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ५२
www.ramprahar.com
शनिवार, ७ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल -उपमुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई :** राज्यात आतापर्यंत मोठ्या प्रमाणात परकीय गुंतवणूक झालेली आहे. तरीही राज्यात येणारे उद्योग, प्रकल्प परराज्यात जात आहेत. नव्या उद्योगधंद्यांसाठी गुजरात तसेच इतर राज्यांना विशेष प्राधान्य दिले जात आहे, असा आरोप विरोधकांकडून केला जातो. आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट आकडेवारी सादर केली आहे. देशातील एकूण गुंतवणुकीच्या ५२.४६ टक्के गुंतवणूक ही एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. आम्ही अडीच वर्षात पाच वर्षांचे काम करून दाखवू, असे सांगितले होते. आता आम्ही सव्वा दोन वर्षांत ३,१४,३१८ कोटी रुपयांची गुंतवणूक आणून दाखविली आहे, असे फडणवीस म्हणाले आहेत. जे लोकं नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न करत होते की, महाराष्ट्रातील उद्योग बाहेर चालले आहेत आज त्यांना या आकड्याने पूर्ण उत्तर मिळाले आहे, असेही त्यांनी एक्स अकाउंटवर म्हटले आहे.

अंतरंग
शेतकऱ्यांना दिवसा विजेसाठी पहिला सौरऊर्जा प्रकल्प सुरू/२
'संवादप्रहर'मध्ये सायबर क्राईम कायदेतज्ज्ञ ॲड. पंकज बाफना/६
माणगावची जलतरणपटू ध्रुवी खाडेची 'सुवर्ण' हॅट्ट्रिक/८

# रायगड जिल्हा उद्योगाचे हब

## पालकमंत्री उदय सामंत यांचे प्रतिपादन



**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा उद्योगाचे हब म्हणून विकसित होत आहे. जिल्ह्यातील पायाभूत सेवा सुविधांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. हा जिल्हा उद्योग, पायाभूत क्षेत्रात कायम आघाडीवर राहील, असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी (दि. ६) केले.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रायगड जिल्ह्यातील कोलाड आणि वीर रेल्वेस्थानक परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. या दोन्ही कामांचे लोकार्पण पालकमंत्री उदय सामंत आणि सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमांना खासदार सुनील तटकरे, खासदार धैर्यशील पाटील, आमदार भरत गोगावले, माजी आमदार अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी किशन जावळे, अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, कार्यकारी अभियंता महेश नामदे, कार्यकारी अभियंता जगदिश सुखदेवे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री उदय सामंत म्हणाले, कोकणाचा सर्वांगीण विकास आमच्या शासनाचे मुख्य धोरण आहे. रायगड जिल्ह्यात विविध विकासकामे वेगाने सुरू असून अनेकविध प्रकल्प येऊ घातले आहेत. पनवेलमध्ये ८३ हजार कोटींचा सेमीकंडक्टर प्रकल्प येणार आहे. दिघी पोर्टला उद्योग सिटी म्हणून मान्यता देण्यात आली आहे तसेच नवी मुंबईला मोठे एक्सिबिशन सेंटर उभारण्यात येणार आहे.

कोकणातील सर्व रेल्वेस्थानके अत्याधुनिक आणि सर्व सुविधायुक्त करण्यात येणार आहेत. यासाठी एमआयडीसीमार्फत पुढाकार घेण्यात येणार आहे. या अंतर्गत रत्नागिरी रेल्वेस्थानक विकसित करण्यात येत असून प्रत्येक जिल्ह्यातील एक स्थानक या माध्यमातून विकसित करण्यात येईल, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

खासदार सुनील तटकरे म्हणाले की, अंतुलेसाहेबांनी कोकणात दळणवळणाचे जाळे उभे केले. त्यांचे हे कार्य सार्वजनिक बांधकाम विभाग पुढे नेण्याचे काम करीत आहे. कोलाड रेल्वेस्थानक येथील फ्लायओव्हर मंजुरी दिली आहे. कोलाड-दिघी रस्त्याचे काम सुरू आहे तसेच विविध रस्त्यांची कामे प्रगतिपथावर आहेत. रोहा हे रेल्वे जंक्शन आहे. येथे तांत्रिक स्टॉप आहे तो प्रवासी स्टॉप होण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे, असेही त्यांनी सांगितले.

या वेळी खासदार धैर्यशील पाटील, आमदार भरत गोगावले यांचीही समयोचित भाषणे झाली.

### कोलाड, वीर स्टेशन परिसर सुशोभीकरण कामाचे लोकार्पण

### पर्यटन विकासाला चालना -मंत्री रवींद्र चव्हाण

या वेळी मंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले की, कोकण रेल्वेच्या सर्वस्थानक परिसरांचे सुशोभीकरण करणे आवश्यक होते. ३२ स्टेशनपैकी जास्त वापर असणाऱ्या स्टेशनच्या सुशोभिकरणास पहिल्या टप्प्यात सुरुवात करण्यात आली असून १२ स्टेशनवर स्थानिक थीम लक्षात घेऊन सुशोभीकरण काम एक वर्षाच्या आत पूर्ण करण्यात आले आहे. या माध्यमातून पर्यटन विकासाला निश्चितच चालना मिळेल.

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयाला 'नॅक'ची ए श्रेणी

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन आणि मानांकन परिषद (नॅक) बंगळुरूकडून ए श्रेणी आणि ३.०४ सीजीपीएसह मानांकन प्राप्त झाली आहे. यासह महाविद्यालयाने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. याबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.

नॅक तपासणी पथकाने नुकतीच २० व २१ ऑगस्ट महाविद्यालयाला भेट दिली. या समितीमध्ये डॉ. शितिकांता मिश्रा (उपकुलगुरू, शिक्षा अनुसंधान विद्यापीठ, भुवनेश्वर, ओडिसा) डॉ. राजशेखरन बालसुब्रमण्यम (निवृत्त प्राध्यापक, व्यवसाय व व्यवस्थापन विभाग, मनोमिलियन सुंदरम विद्यापीठम तामिळनाडू) आणि डॉ. खुर्शिद अहमद खान (प्राचार्य, इस्लामिया महाविद्यालय, श्रीनगर, जम्मू काश्मीर) यांचा समावेश होता. नॅक तपासणी पथकाने महाविद्यालयाच्या प्रत्येक विद्या शाखेच्या विभागांना तसेच प्रशासकीय कार्यालय, परीक्षा कार्यालय, ग्रंथालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, अध्ययन व अध्यापन विस्तार विभाग, जिमखाना इथे भेट देत संबंधित विभाग प्रमुखांशी संवाद साधला आणि महाविद्यालयाच्या कार्यप्रणालीचा अहवाल तयार केला, जो नॅक पोर्टलवर अपलोड करण्यात आला आहे. नॅक समिती विविध सात निकषांच्या आधारे उच्च शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन आणि मान्यता प्रदान करते. मूल्यमापन निकषांमध्ये अभ्यासक्रमांचे पैलू अध्यापन, शिक्षण आणि मूल्यमापन, संशोधन, नवकल्पना आणि विस्तार, पायाभूत सुविधा आणि शिक्षण, संसाधने, विद्यार्थी समर्थन आणि प्रगती प्रशासन, व्यवस्थापन, मूल्ये आणि सर्वोत्तम पद्धती या संदर्भात तपासणी पथकाने महाविद्यालयाच्या एकूण कामकाज व व्यवस्थापनाचे मूल्यांकन केले आणि ३.०४ च्या सीजीपीएसह ए श्रेणी प्रदान केली.

भेटीदरम्यान नॅक तपासणी पथकाने व्यवस्थापन सदस्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी पालक आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थ्यांसोबत बैठक घेतली तसेच तपासणी पथकाच्या सदस्यांनी कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी मूलभूत सुविधा पुरवल्याबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी तयार केलेली उत्तम शिक्षण व्यवस्था पाहून पथक खूप प्रभावीत झाले आणि नवी मुंबईतील एक उत्तम महाविद्यालय म्हणून त्यांनी रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा उल्लेख केला. निष्कर्षात तपासणी पथकाने महाविद्यालयाच्या भविष्यातील प्रगतीसाठी आणि विकासासाठी दिलेल्या सूचनांच्या आधारे महाविद्यालयाने अतिरिक्त सुधारणा करण्यासाठी आणि पुढील नॅक प्रमाणक मानांकन व्यवस्थेमध्ये उच्च श्रेणी मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याच्या योजना आखल्या आहेत.

प्राप्त झालेले नॅक मानांकन महाविद्यालयाच्या शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी आणि निर्धारित गुणवत्ता मानकांचे पालन करण्यासाठी समर्पणाचे प्रतीक आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नेतृत्वाखाली रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. **(पान २ वर..)**



# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे दातृत्व आदर्शवत

## 'रयत'चे अध्यक्ष खासदार शरद पवार यांचे गौरवोद्गार

**सातारा : रामप्रहर वृत्त**

पैसे मिळवता येतात, पण त्या पैशांचा आपल्या दातृत्वाने सदुपयोग कसा करायचा याचा आदर्श लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सगळ्यांसमोर ठेवला आहे, असे गौरवोद्गार रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, खासदार शरद पवार यांनी संस्थेच्या हनुमान विद्यालयाच्या नूतनीकृत इमारतीच्या उद्घाटनावेळी काढले. या इमारतीसाठी ७५ लाख रुपयांची देणगी दिल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जाहीर सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला. या वेळी त्यांनी विद्यालयाच्या विकासासाठी आणखी २५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.

### निढळ येथील विद्यालयाच्या नूतनीकृत इमारतीचे उद्घाटन

सातारा जिल्ह्याच्या खटाव तालुक्यातील निढळ येथे रयत शिक्षण संस्थेच्या हनुमान विद्यालयाची नूतनीकृत इमारत रायगडचे माजी खासदार आणि रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ लाख रुपयांच्या देणगीतून उभारण्यात आली आहे. या नूतनीकृत इमारतीचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते तसेच वर्गखोल्या, विविध कक्ष, ऑफिस यांचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह उपस्थित अन्य मान्यवरांच्या हस्ते गुरुवारी (दि. ५) झाले. **(पान २ वर..)**

# पनवेल शहरातील वाहनतळ झाले कार्यान्वित

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास आता मदत मिळणार असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने साकारण्यात आलेल्या वाहनतळाचे उद्घाटन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ६) झाले. या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पनवेल शहराचे स्वरूप हे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या विकासकामांमुळे बदलत चालले आहे, असे प्रतिपादन केले.

पनवेल महापालिकेसह संपूर्ण विधानसभा क्षेत्रात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना भेडसवणाऱ्या समस्या सोडवून त्यांना विकासकामांच्या माध्यमातून विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम होत आहे. पनवेल शहरातील वाहतूक कोंडीची समस्या बिकट होत चालली होती. ऐन सणासुदीच्या काळात होणाऱ्या वाहतूक कोंडीचा नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागत होता. **(पान २ वर..)**

## प्रवीण कुमारला 'सुवर्ण'

**पॅरिस : वृत्तसंस्था**

भारतीय पॅरा ॲथलीट प्रवीण कुमारने पॅरिस पॅरालिम्पिकच्या पुरुषांच्या उंच उडी टी६४ स्पर्धेत आशियाई विक्रम मोडून सुवर्णपदक जिंकले. लहान पायांसह जन्मलेल्या प्रवीणने सहा खेळाडूंमध्ये हंगामातील सर्वोत्तम २.०८ मीटर उडी मारली आणि अव्वल स्थान पटकावले. भारताचे हे एकूण २६वे, तर सहावे सुवर्णपदक ठरले. यापूर्वी प्रवीणने टोकियो पॅरालिम्पिकमध्ये २.०७ मीटरच्या सर्वोत्तम प्रयत्नाने रौप्यपदक जिंकले होते. **(सविस्तर वृत्त पान ८ वर..)**

### राम प्रहर रविवारचा अंक नाही

गणेश चतुर्थीनिमित्त 'राम प्रहर'च्या कार्यालयास शनिवारी सुट्टी असल्यामुळे रविवार (दि. ८)चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी. **गणेशोत्सवाच्या सर्वांना शुभेच्छा!**

**-मुख्य संपादक**

# पनवेलमध्ये ३० कोटींची विकासकामे

## भाजप नेते श्रीनंद पटवर्धन यांच्या हस्ते भूमिपूजन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध असलेले आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सुमारे ३० कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन भाजपचे ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ६) करण्यात आले. शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत भूमिपूजन झाले.

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने तब्बल ३० कोटी ७५ लाख ३२ हजार ७५८ रुपये खर्चून पनवेल शहरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण तसेच इतर अनुषंगिक कामे करण्यात येणार आहेत. यामध्ये लोकमान्य टिळक मार्ग, महात्मा ज्योतिबा फुले मार्ग, राम गणेश गडकरी मार्ग, आगरी समाज हॉल रस्ता, तहसील ऑफिस रस्ता, हुतात्मा हिरवे गुरुजी मार्ग, महाराष्ट्र बँक ते रूपाली टॉकीज रस्ता, नाडकर्णी हॉस्पिटलसमोरील रस्ता, स्पर्श हॉस्पिटल ते डॉ. भगत दवाखान्यापर्यंतचा रस्ता, हॉटेल विसावा ते अमित अपार्टमेंट रस्ता या प्रमुख रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण होणार आहे.

या समारंभांना माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, राजू सोनी, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, भाजप जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, संजय भगत, अमित ओझे, केदार भगत, युवा मोर्चा शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, मयुरेश खिस्मतराव, अंजली इनामदार, देवांशु प्रभाळे, अक्षय सिंग, ठेकेदार पी.डी. देशमुख आदी उपस्थित होते.




# शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी पहिला सौरऊर्जा प्रकल्प सुरू

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत राज्यात ९२०० मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहे.

यापैकी ३ मेगावॅट क्षमतेचा पहिला सौरऊर्जा प्रकल्प छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील धोंदलगाव येथे कार्यान्वित करण्यात झाला. या प्रकल्पामुळे १७५३ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे.

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने शेतकऱ्यांसाठी ही योजना राबविण्यात



येत आहे. हा जगातील सर्वात मोठा विकेंद्रित सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे. धोंदलगाव प्रकल्प ही सुरुवात आहे. या वर्षी मार्चमध्ये प्रदान केलेल्या ९२०० मेगावॅट विकेंद्रित सौर प्रकल्पांचा हा एक भाग आहे. प्रकल्पांतर्गत संपूर्ण क्षमता डिसेंबर २०२५पर्यंत टप्प्याटप्प्याने कार्यान्वित केली जाणार आहे, असे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले.

धोंदलगाव येथे महावितरणच्या उपकेंद्रापासून सुमारे साडेतीन किमी अंतरावर असलेल्या १३ एकर शासकीय जमिनीवर हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या कामासाठी महावितरणकडून संबंधित कंपनीला ७ मार्च २०२४ रोजी कार्यादेश देण्यात आला तसेच १७ मे रोजी वीजखरेदी करार करण्यात आला. त्यानंतर अवघ्या साडेचार महिन्यांत प्रकल्प उभारून गुरुवारी (दि.५) कार्यान्वित करण्यात आला आहे. हा प्रकल्प महाविरणच्या धोंदलगाव ३३ केव्ही उपकेंद्राशी जोडण्यात आला आहे. त्यामुळे उपकेंद्रातून निघणाऱ्या पाच वीजवाहिन्यांवरील १,७५३ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळणार आहे. धोंदलगाव, नालेगाव, अमानतपूरवाडी व संजरपूरवाडी या गावांतील शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे.

मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.०चा विस्तार करून त्याची व्याप्ती वाढविण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाने नुकतीच मान्यता दिली आहे. या योजनेतून सौरऊर्जा निर्मिती क्षमतेचे उद्दिष्ट सात हजार मेगाव्हॅटने वाढवून १६ हजार मेगावॅट विकेंद्रित सौर ऊर्जा क्षमता निर्मिती उद्दिष्टास शासनाने मान्यता दिली आहे. यामुळे राज्यातील १०० टक्के कृषी पंप ग्राहकांना दिवसा वीजपुरवठा होणार आहे.

## वसंत ओसवालांच्या निधनाने सामान्यांसाठी झटणारा नेता हरपला –ना.रवींद्र चव्हाण

**पाली : प्रतिनिधी**

वसंतराव ओसवाल यांच्या निधनाने सामान्यांसाठी झटणारा नेता हरपला आहे, अशी खंत सार्वजानिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केली.

सुधागड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष वसंत ओसवाल यांचे नुकतेच निधन झाले. मंत्री रवींद्र चव्हाण आणि खासदार धैर्यशील पाटील यांनी शुक्रवारी (दि.६) ओसवाल यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

या वेळी त्यांनी जुन्या आठवणीना उजाळादेखील दिला. खासदार धैर्यशील पाटील म्हणाले की, वसंतराव ओसवाल यांनी आदिवासी, कष्टकरी, शोषित वंचित घटकाच्या विकासासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या निधनाने रायगड जिल्ह्याच्या चळवळीची खूप मोठी हानी झाली आहे.

या वेळी भाजप नेत्या गीता पालरेचा, मुलगी नीता धोका, तसेच मुलगा महेश ओसवाल, भाऊ सुभाष ओसवाल, मोहन ओसवाल, जयंत ओसवाल, प्रकाश पालरेचा, भाजप उपाध्यक्ष राजेश मपारा, आरिफ मणियार, सुशील शिंदे आदी उपस्थित होते.



## फुंडे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची ग्रंथालय क्षेत्रभेट

**उरण : रामप्रहर वृत्त**

फुंडे हायस्कूल येथील रयत गुरुकुल प्रकल्पांतर्गत इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी वीर वाजेकर महाविद्यालयास आणि तेथील सुसज्ज ग्रंथालयास भेट दिली. विद्यार्थी संख्या जास्त असल्याने त्या क्षेत्रभेटीचे तीन दिवस नियोजन करण्यात आले होते.

ग्रंथपाल सुप्रिया नवले यांनी तिन्ही दिवस विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची इत्थंभूत माहिती सांगितली. जीवनातील वाचनाचे महत्त्व, वाचनाची गोडी निर्माण झाल्याने शिक्षणात प्रगती होते व परिणामी आपण आयुष्यात प्रगती साधू शकतो याचेही त्यांनी विद्यार्थ्यांना महत्त्व पटवून दिले. या क्षेत्रभेटीच नियोजन विभाग प्रमुख अस्मिता पाटील यांनी उत्तमरित्या केले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रल्हाद पवार व हायस्कूलचे प्राचार्य एम.जी म्हात्रे तसेच ग्रंथपाल सुप्रिया नवले यांचे आभार मानण्यात आले.



## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात गणेशमूर्ती कार्यशाळा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या वतीने मार्गदर्शनाखाली बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत शुक्रवारी (दि.६) जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयात शाडू मातीच्या गणेशमूर्तीची कार्यशाळा घेण्यात आली.

महापालिकेच्या वतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यावरती भर दिला जात आहे. उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे व एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रथमेश ठाकूर यांचे सहकार्य मिळाले.

## मुरूड शहरात गणेशोत्सव काळात दोनदा पाणीपुरवठा करण्याची मागणी

### पालिकेला निवेदन

**मुरूड : प्रतिनिधी**

गणेशोत्सव काळात मुरूड शहरात सकाळ व संध्याकाळ असा दोन वेळा पाणीपुरवठा करावा, जेणेकरून नागरिकांना पुरेसे पाणी उपलब्ध होईल, अशी मागणी माजी पाणीपुरवठा सभापती पी.के. आरेकर यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.



याबाबत दिलेल्या निवेदनात आरेकर यांनी म्हटले आहे की, कोकणातील महत्त्वाचा उत्सव अर्थात गणेशोत्सव. चाकरमानी सहकुटूंब सहपरिवार या लाडक्या बाप्पाच्या आगमनापासून गणेशचतुर्थीपर्यंत मूळ गावी येऊन आनंद साजरा करतात. त्यामुळे सद्यस्थितीत मुरूड नगर परिषदेकडून केला जाणारा पाणीपुरवठा शहरास अपुरा पडू लागला आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये याकरिता पाणीपुरवठा विभागाने ६ ते १७ सप्टेंबरपर्यंत सकाळी व संध्याकाळी दोन वेळा पाण्याचा पुरवठा करावा. या दृष्टीने मुख्याधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा विभागाकडून योग्य नियोजन करून कार्यवाही करावी, अशी मागणी आरेकर यांनी निवेदनामार्फत केली आहे.

**पान १ वरुन**

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयाला 'नॅक'ची ए श्रेणी

यासाठी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रभाकर जोशी व दीपक शिंदे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे यांचे आदर्श नेतृत्व आणि शैक्षणिक प्रगतीबद्दलची निष्ठा यांना विशेष श्रेय आहे. प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या समन्वयक डॉ. माहेश्वरी झिरपे महाविद्यालयाचे संपूर्ण प्राध्यापक व कर्मचारीवर्गाने राष्ट्रीय मूल्यांकन आणि मानांकन परिषदेने ठरवलेल्या निर्धारित निकषांचे पालन करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांनी समग्र शिक्षण आणि शैक्षणिक प्रगतीसाठी अनुकूल वातावरण निर्माण केले. या विषयी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था व पालकवर्गाने महाविद्यालयाचे भरभरून कौतुक केले. भविष्यातही महाविद्यालयाची अशीच उच्च गुणवत्तापूर्ण प्रगती राहील, अशी ग्वाही सर्व सेवकांनी दिली.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे दातृत्व आदर्शवत

या वेळी संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार म्हणाले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या कामाला प्रोत्साहन देण्यासाठी नेहमीप्रमाणे मुक्तहस्ते मदत केली. ते सातारला रयत शिक्षण संस्थेचे चार वर्षे विद्यार्थी होते. कर्मवीर अण्णांचा कमवा आणि शिका हा कार्यक्रम होता, त्यामध्ये त्यांनी एक वर्ष काम केले. चार वर्षे या ठिकाणी राहून शिक्षण पूर्ण केले आणि संस्थेमध्ये शिक्षक म्हणून काम केले. वर्ष, दोन वर्षे इथे काम केल्यानंतर त्यांच्या भागामध्ये नवी मुंबईत ते गेले. तिथे काम करायला सुरुवात केली. नंतरच्या काळामध्ये व्यवसायामध्ये पडले आणि या क्षेत्रात कष्ट करून सगळ्यांना बरोबर घेऊन प्रचंड यशस्वी झाले. त्या यशाचाच परिणाम संस्थेचे कोणतेही नवीन काम असले आणि ते हजर असले तर मला खात्री असते की आता या कामाला जो काही अडथळा किंवा कमतरता आहे त्यातून मार्ग निघेल. आजपर्यंत मला आकडा लक्षात नाही. मागे एकदा मी माहिती घेतली होती की, संस्थेला त्यांच्याकडून सहाय्य किती झाले असेल? जो आकडा एक वर्षापूर्वीचा माझ्याकडे होता तो शंभर कोटींचा होता. माझ्या मते या राज्यात कोणत्याही शैक्षणिक क्षेत्रामध्ये देणगीदार असतात. तरीपण त्यांच्यात सातत्य नसते. वर्षानुवर्ष मदत करत असतात, देणगीदार असतात, मात्र स्वतःच्या शाळेपुरते हे दातृत्व ते दाखवत असतात. रामशेठ यांचे वैशिष्ट्य हे आहे की, आम्ही लोक आदिवासी भागात गेलो. संस्थेची शाखा त्या ठिकाणी आहे. सगळे काम बघितले. काही कमतरता जाणवल्यावर रामशेठ यांना सांगितले की इतके पैसे जाहीर करा. त्यानुसार त्यांनी अशा अनेक शाखांमध्ये अर्थसहाय्य केलेले आहे. पैसे मिळवता येतात, पण त्या पैशांचा सदुपयोग कसा करायचा याचा आदर्श रामशेठ यांनी सगळ्यांसमोर ठेवला आहे. म्हणून याही शाखेला त्यांनी अर्थसहाय्य करण्याचा निर्णय घेतला. त्याबद्दल मी त्यांना अंतःकरणापासून धन्यवाद देतो, त्यांचे आभार मानतो.

निढळ गावचे सुपुत्र तथा रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या पुढाकारातून आणि संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिलेल्या ७५ लाख रुपये देणगीतून इमारतीचे नूतनीकरण करण्यात आले आहे. राज्याला दिशादर्शक ठरणारी शाळेची अद्ययावत आणि सर्व सुविधांनी युक्त इमारत निढळमध्ये उभारण्यात आली आहे. संगणक कक्ष, ग्रंथालय, डिजिटल वर्ग, सुसज्य स्टाफरूम, बोलक्या भिंती, मुख्याध्यापक कक्ष, रंगरंगोटी, नवीन बेंचेस, अत्याधुनिक डिजिटल बोर्ड अशा अनेक सुविधा विद्यार्थी आणि शिक्षकांना देण्यात आल्याची माहिती संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी या वेळी दिली.

या कार्यक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर, हनुमान विद्यालयाचे मुख्याध्यापक जगदीश निर्मळ, माजी विद्यार्थी विजय जाधव, कला शिक्षक प्रदीप कुंभार यांचा विशेष सत्कार करण्यात आला तसेच स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या आणि विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.


या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करून संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या दूरदृष्टीचे कौतुक केले.

कार्यक्रमास संस्थेचे व्हॉईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, सचिव विकास देशमुख, कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, आमदार विश्वजीत कदम, आमदार शशिकांत शिंदे, माजी आमदार प्रभाकर घार्गे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रभाकर देशमुख, ॲड. रवींद्र पवार, डॉ. सदाशिव कदम, डॉ. विठ्ठल शिवणकर, सांगली दक्षिण विभागीय चेअरमन डॉ. एम.बी. शेख, संस्थेचे सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे, डॉ. राजेंद्र मोरे, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, विभागीय अधिकारी नवनाथ जगदाळे, पीआरओ बाळासाहेब कारंडे यांच्यासह पदाधिकारी, रयत सेवक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पनवेल शहरातील वाहनतळ झाले कार्यान्वित

याची दखल घेऊन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या पुढाकारातून आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहासमोरील भूखंडावर महापालिकेच्या वतीने एक कोटी २५ लाख ९९ हजार ६४५ रुपये खर्चून वाहनतळ उभारण्यात आला आहे. या वाहनतळाचे उद्घाटन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, राजू सोनी, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, भाजप जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, संजय भगत, अमित ओझे, केदार भगत, युवा मोर्चा शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, मयुरेश खिस्मतराव, अंजली इनामदार, देवांशु प्रभाळे आदी उपस्थित होते.



## मूगवलीचा श्री स्वयंभू गणपती

मराठी मनाचे श्रीगणेश हे लाडके दैवत आहे. या गणेशाची पूजाअर्चा करूनच शुभकार्याला सुरुवात केली जाते. गजाननाची अनेक रूपे व नावे आहेत. गणेशोत्सवाला सुरुवात होत आहे. रायगड जिल्ह्यात अष्टविनायकांपैकी दोन गणपती आहेत. पालीचा बल्लाळेश्वर आणि महडचा वरदविनायक. याप्रमाणेच इतरही अनेक जागृत स्थाने भाविकांची श्रद्धास्थाने आहेत. माणगावजवळील मुगवलीचे गणपतीचे स्थान हे जागृत म्हणून परिचित आहे.

रायगड जिल्ह्यातील मुंबई–गोवा महामार्गावर माणगावपासून तीन किमी अंतरावर मुगवली फाटा आहे. तेथून अवघ्या दीड किमी अंतरावर स्वयंभू गणेश मंदिर आहे. मुगवली हे १०० ते १२५ घरांचे छोटे गाव आहे. गाव जरी छोटे असले तरी या गणपतीमुळे त्याची ख्याती सर्वदूर पसरली आहे.




या देवस्थाबाबत एक अख्यायिका सांगितली जाते ती म्हणजे सुमारे ३२५ वर्षांपूर्वी मुगवली परिसरातील एका शेतात एक शेतकरी नांगरणी करीत होता. अचानक शेतातील एका दगडास नांगराचा फाळ लागून तेथून रक्त येऊ लागले. हे पाहून त्या शेतकऱ्याने गावाकडे धाव घेऊन घडलेली सर्व हकीकत गावकऱ्यांना सांगितली.

ग्रामस्थांनी याबाबत गोरेगावच्या जाणकारांचा सल्ला घेतला व हे गणेशाचे स्वयंभू महास्थान आहे, असे त्यांनी सांगितल्यावर ग्रामस्थांनी त्या पाषाणाभोवतालची जागा स्वच्छ केली. त्यानंतर सर्वांनाच नैसर्गिक अवस्थेतील गणेशाचे मोहक दर्शन झाले. ही मूर्ती जमिनीतून वर आलेल्या दोन फूट लांबी–रूंदीच्या पाषाणावर नैसर्गिक अवस्थेत असून मस्तक, उभी वळलेली सोंड, पोट अशा स्वरूपाची आहे. मागील बाजूस सिंह असून त्यास पाठ टेकून खाली पाय सोडून तो बसलेला आहे. या गणेशाचे नेत्र डोळे बोलके वाटतात.

सर्व ग्रामस्थांनी व परिसरातील नागरिकांनी सुप्तावस्थेत असलेल्या या जागृत गणेशासाठी सुरुवातीस एक कुडाचे मंदिर उभारले. त्यानंतर प्राचीन काळातील या मंदिराचा ३५ वर्षांपूर्वी जीर्णोद्धार करून गाभाऱ्यात संगमरवरी दगड बसविण्यात आला व मंदिरही थोडे प्रशस्त करण्यात आले.

१९६८साली मुगवलीच्या स्थानिक स्वयंभू गणेश मंडळाने गणेश व्यवस्थापन समिती स्थापन करून श्रींच्या भोवती उत्तमपैकी छोटासा गाभारा बांधला आणि दररोजच्या गणेशपुजेची व्यवस्था केली. पूर्वीच्या जुन्या कौलारू मंदिराचे रूपांतर आता भव्य अशा सिमेंट कॉंक्रीटच्या २२ फूट रुंद व ३० फूट लांब अशा सुंदर मंदिरात झाले आहे.

मंदिराचे शिखर मुंबई–महाड महामार्गावरील मुगवली फाट्याजवळूनही दिसते. येथील गणेश हा पूर्वीभिमुख आहे. त्यामुळे गणेशाच्या मूर्तीवर दररोज सूर्यकिरण पडावेत अशीही कल्पकता मंदिर बांधताना योजण्यात आली आहे. हा गणेश नवसाला पावतो, अशी भाविकांची श्रद्धा असल्याने जागृत देवस्थान म्हणून परिचित आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून तसेच मुंबई–पुण्यातून भाविक मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी येऊन येथे नवस बोलतात व आपण बोललेला नवस फेडण्यासाठीही मोठ्या संख्येने येत असतात. गणेशोत्सव काळात तर रायगडसह मुंबई, पुणे, ठाण्यातून भाविक दर्शनासाठी येतात.

**–सिद्धी शंकर दाखिनकर, गांगवली, माणगाव**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# निवडक

## आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान



**मोहोपाडा** : संविधान आणि संसद असोसिएशनतर्फे राजिप शाळा वडवळ येथील शिक्षक राजाराम जाधव व त्यांच्या पत्नी रेखा जाधव यांना संसद इंटरनॅशनल अवॉर्ड देऊन गौरविण्यात आले. शिक्षक दिनाचे औचित्य साधत अमेरिका जागतिक आदर्श शिक्षक पुरस्कार म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले. गेले अनेक वर्षे विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम करीत आहेत. त्यांनी केलेले शाळेमध्ये अमुलाग्र बदल, त्यांनी निर्माण केलेला विकास या सर्व बाबींचा अभ्यास करून यांस सन्मानित करण्यात आले. या वेळी अध्यक्ष डॉ. दत्ता विघवे, सचिव डॉ. शैलेंद्र भांगे, सचिव डॉ. रुषिकेश विघवे, कोषाध्यक्ष चिंतामण भोसले, मिडीया हेड महेश कांबळे, समन्वयक विजया शिंदे, कायदेशीर सल्लागार डॉ. शहानूर सय्यद आदी उपस्थित होते.

## ड्यु ड्रॉप्स शाळेत गणेशोत्सव



**पनवेल** : मिडलक्लास सोसायटी येथील ड्यु ड्रॉप्स शाळेमध्ये पर्यावरणपूरक इकोफ्रेंडली गणेशोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांनी गणपती बाप्पांची आरती केली. पर्यावरणपुरक गणेशोत्सवाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने मुख्याध्यापक, शिक्षकांच्या माध्यमातून शाळेमध्ये इकोफ्रेंडली गणेशोत्सव साजरा करीत पर्यावरणपूरक गणेशोत्सव सण साजरा करू शकतो, हा सामाजिक संदेश शाळेतर्फे देण्यात आला.

## ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभा

**पनवेल :** श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ३४वे पुष्प झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रामध्ये झालेल्या या कार्यक्रमात पुणे येथील युवा गायिका ईश्वरी कुलकर्णी-श्रीगार यांनी आपली सेवा सादर केली. ईश्वरी यांनी आपल्या संगीत सभेची सुरुवात राग श्याम कल्याणमधील जियो मेरो लाल ही बंदिश आणि सावन की सांज भयी ही बंदिश गाऊन गेली. तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल या अभंगाने त्याने संगीत सभेची सांगता केली. राजेंद्र काळे यानी संवादिनी, शार्दुल डोंगरे तबलासाथ व गणेश घाणेकर यानी तालवाद्यसाथ केली. सुखदा मुळ्ये-घाणेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.




# उरणकर नागरिकांचा पर्यावरणपूरक उत्सवाकडे कल

## कागदी लगद्याच्या मूर्तींना पसंती

**उरण : रामप्रहर वृत्त**

गणेशभक्तांकडून पर्यावरणस्नेही असलेल्या कागदी लगद्याच्या मूर्तींना मागणी वाढली आहे. उरणच्या जासई येथील पवार यांच्या कारखान्यात वृत्तपत्राच्या लगद्यापासून गणेशमूर्ती तयार केल्या जात आहेत.

मागील ७० वर्षांपासून या कारखान्यात केवळ पर्यावरणस्नेही शाडू मातीच्या गणेशमूर्ती तयार केल्या जात आहेत. वडिलांनी सुरू केलेल्या या व्यवसायात त्यांचे कुटुंबिय काम करीत आहेत. त्यांच्या कारखान्यात एक, दोन आणि तीन या आकाराच्या कागदाच्या लगद्याच्या मूर्ती तयार करण्यात आल्या आहेत. मातीच्या मूर्तीपेक्षा दोन ते अडीच हजार रुपयांनी महाग तर दोन-तीन हजारांनी प्लास्टरच्या मूर्ती स्वस्त असतानाही सध्या गणेशभक्तांकडून कागदी लगद्याच्या मूर्तीची मागणी वाढली आहे. यामध्ये घरगुतीबरोबरच सार्वजनिक गणेश मंडळांकडूनही या मूर्तींना मागणी आहे.



प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती नदीपात्रात विसर्जन करून पाणी प्रदूषित करण्यापेक्षा शाडूच्या किंवा कागदी लगद्याच्या मूर्तीचे पूजन करून कृत्रिम तलावात विसर्जन करणे ही काळाची गरज आहे.

### मूर्ती वजनाने हलक्या

***या मूर्ती तयार करण्यासाठी कागद, पुठ्ठे, गम यांचा वापर केला जातो. सुरुवातीला मूर्तीसाठी साचा तयार करून त्यानंतर साच्यात या मूर्ती तयार केल्या जात आहेत. माती आणि प्लास्टरपेक्षा या मूर्ती तयार करण्यासाठी अधिक वेळ लागतो, मात्र या मूर्ती तयार झाल्यानंतर रंगकाम केल्यावर मूर्तीतील फरक सहसा ओळखता येत नाही. त्यामुळे गणेशभक्तांकडूनही या मूर्तींना पसंती दिली जात आहेत.***

# पनवेलमध्ये भादवी बीज महोत्सव उत्साहात

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन सुरुवातीचे प्रतिक असलेला भादवी बीज महोत्सव पनवेलमध्ये गुरुवारी (दि.५) मोठ्या उत्साहात साजरा झाला. या महोत्सवाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेतले तसेच सर्वांना महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.



भादवी बीज हा भाद्रपद महिन्याच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जाणारा एक महत्त्वपूर्ण सण आहे. या दिवशी नववर्ष म्हणूनही मानले जाते आणि हा शेती समुदायासाठी विशेष महत्त्वाचा आहे. त्यानुसार मिडलक्लास हौसिंग सोसायटीमधील गणेश मंदिराच्या सभागृहात सिरवी सामजाच्या वतीने भादवी बीज महोत्सवाचे आयोजन आयोजित केला होता.

या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, युवामोर्चा पनवेल शहराध्यक्ष सुमीत झुंझारराव, समाजाचे अध्यक्ष धनारामज सोयल, सचिव वोराराम गेहलोत, खजिनदार तिलोकराम गेहलोत, नेमाराम आगलेचा, देदाराम पवार आदी उपस्थित होते.



# संस्कृतीशी जोडले जाणे महत्त्वाचे -परेश ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या संस्कृतीशी जोडले जाणे हे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी अथर्वशीर्ष पाठांतर अभ्यासवर्गाच्या समारोपावेळी केले.

अथर्वशीर्ष हे एक शक्तिशाली स्तोत्र आहे जे गणपती देवतांना समर्पित आहे. हे नियमित पठण केल्याने जीवनात अनेक प्रकारचे फायदे होतात. याचे महत्त्व बालवयात चिमुकल्यांना समजावे याकरता माजी नगरसेविका रुचिता लोंढे यांच्या वतीने १२ वर्षांखालील मुलांसाठी श्री अथर्वशीर्ष पाठांतर अभ्यासवर्गाचे आयोजन श्री विरुपाक्ष मंदिरामध्ये आयोजन केले होते. या अभ्यासवर्गाचा समारोप गुरुवारी (दि.५) झाला. अभ्यासवर्गामध्ये सहभागी झालेल्या मुलांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल शहराध्यक्ष अनिल भगत, उपाध्यक्ष अमित ओझे, ज्येष्ठ नेते श्रीनंदू पटवर्धन, माजी नगरसेवक राजू सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रभाग क्र. १९चे अध्यक्ष पवन सोनी, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस चिन्मय समेळ, पनवेल शहराध्यक्ष सुमीत झुंझारराव, अभिषेक पटवर्धन यांच्यासह पदधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



**उलवे नोड : येथील रयत शिक्षण संस्थेच्या शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तथा 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना सुधीर ठाकूर यांना राजिप आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यानिमित्त त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची शुक्रवारी भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सुधीर ठाकूर, वैभव घरत, गणेश भोईर आणि भास्कर घरत उपस्थित होते.**

## गौराई आली घरान... गीताला पसंती

**उरण :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशभक्तांना गणपती उत्सवाचा पुरेपूर व चांगला आनंद लुटता यावा यासाठी गीतकार मनिष भोईर (पाणजे) यांनी 'गौरी आली घरान पाहुनी गो' हे गीत लिहिले असून या गीताचे गायन जगदीश पाटील, गायिका रागिनी भगत यांनी केले आहे. सध्या हे गीत सर्वत्र मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

गणेशभक्तांनी या गीताला मोठ्या प्रमाणात पसंती दिली आहे. युट्यूब चॅनेलला 'गौराई आली घरान पाहुनी गो' असे सर्च करताच लगेच हे सुंदर गाणे सर्वांना ऐकावयास व पहावयास मिळत आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक जगदीश पाटील यांनी गायलेले हे गाणे अतिशय तुफान वेगाने सर्वत्र व्हायरल होत आहे.




# शिक्षक दिनानिमित्त गव्हाण येथे भरली अभिरूप शाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये गुरुवार (दि.५) अभिरूप शाळा भरवून विद्यार्थ्यांनीच शिक्षकांच्या भूमिका साकारल्या.

या दिवशी विद्यार्थी मुख्याध्यापिका झालेल्या अक्षरा पाटील, उपमुख्याध्यापिका जिविका पाटील व पर्यवेक्षिका अभिलाषा म्हात्रे तसेच ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थी प्राचार्या निकिता कांबळे यांनी वेळापत्रकनिहाय नियोजन करून अभिरुप शाळा चालविली. प्रारंभी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर झालेल्या समारंभात विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षकांचे अभिनंदन केले. कार्यक्रमासाठी उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, चित्रलेखा पाटील व अन्य सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थीनी मुख्याध्यापिका अक्षरा पाटील हिने शिक्षकांप्रती सद्भावना व्यक्त करून कामकाजाविषयी आपले अनुभव सांगितले. सर्व विद्यार्थी अध्यापक व नियमित अध्यापकांना विद्यालयाच्या वतीने लेखणी व गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक साईशा घोलप हिने केले. कार्यक्रमासाठी शिक्षक दिन विभाग प्रमुख चारुशीला ठाकूर, वृषाली म्हात्रे, जुनिअर कॉलेजचे शिक्षक दिन विभाग प्रमुख उमेश पाटील व जयवंती ठाकूर यांनी परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांनीही सर्व शिक्षकांचेही मनःपूर्वक आभार मानून भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन आपला स्नेह व्यक्त केला. प्रेषित लांडगे या विद्यार्थ्याने शिक्षक दिनाचे महत्त्व सांगून शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांनी, सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांना आजच्या शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी शिक्षकाची समाजातील भूमिका कशी महत्त्वाची आहे, असे सांगितले.

### स्टेट बँक ऑफ इंडियातर्फे शिक्षकांना शुभेच्छा

***खारकोपर येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखाधिकारी मैत्री जाधव यांनी विद्यालयास भेट देऊन प्राचार्य, उपमुख्याध्यापक, लाईफ मेंबर व शिक्षकांचा तसेच विद्यार्थी शिक्षक प्रतिनिधींचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.***



## दुचाकीची दुभाजकाला धडक; एक ठार, एक जण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील टी पॉईंटकडून पळस्पेकडे जाणाऱ्या रोडवर दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने करंजाडे येथील सेवा रस्त्यावरील दुभाजकाला दुचाकी धडकून अपघात झाला.

या अपघातात दुचाकीस्वार हा गंभीररित्या जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला, तर त्याच्याबरोबर असलेली महिलाही गंभीर जखमी झाली आहे.

राहूल राजवर्धन (२८) व त्याची मैत्रिण सिनीया कांबळे (२६) सह दुचाकीवरून भरधाव वेगाले पनवेल बाजूकडे येत असताना टी पॉईंटकडून पळस्पेकडे जाणाऱ्या रोडवर राहूल याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने करंजाडे येथील सेवा रस्त्यावरील दुभाजकाला दुचाकी धडकून झालेल्या अपघातात राहूल हा गंभीररित्या जखमी होऊन राहूल कांबळे यांचा मृत्यू झाला आहे, तर सिनीया ही जखमी झाली आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## संपादकीय

# बुद्धि दे गणनायका!

बाप्पाच्या आगमनाकडे गेले काही दिवस आपण सारेच डोळे लावून बसलो होतो. त्यामुळेच आज पाऊस-पाणी, प्रवासातील अडचणी किंवा अन्य कुठल्याही स्वरुपाच्या अडथळ्यांना मागे टाकून श्रीगणरायाचे उत्साहात स्वागत केले जाईल. सगळ्यांनी एकत्र येऊन मनोभावे श्रीगणेशाची आराधना करतानाच प्रतिवर्षी तो अधिकाधिक पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठीही कटिबद्ध होऊया

**गेले काही दिवस अवघा महाराष्ट्रच काय तर देशभरातील अनेक भागांमध्ये गणरायाच्या आगमनाची जोरदार तयारी सुरू होती. ब्रिटिशांची जुलमी राजवट उलथून टाकण्यासाठी लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रात सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रातील मराठी भाषिकांसोबतच इथे स्थायिक अमराठी जनांनीही केव्हाचाच आपलासा केला आहे. हलकेहलके तो महाराष्ट्राच्या पलीकडे देशभरात आणि परदेशांतही जिथे-जिथे भारतीय वास्तव्य करून आहेत तिथे-तिथे साजरा होतो आहे. गणपती हा सुखकर्ता, दु:खहर्ता आहे. कोणतेही शुभ कार्य करताना आपण श्रीगणेशाची पूजा सर्वात आधी करतो. गणपती ही बुद्धीची देवता मानली जाते. गणपती हे केवळ पूज्य दैवतच नसून तो कलांचाही अधिष्ठाता आहे. तसे पाहता प्रत्येक हिंदू घरातील देव्हाऱ्यात गणपतीची छोटीशी का होईना मूर्ती असतेच. पण सगळ्यांनी एकत्र येऊन श्रीगणेशाची आराधना करण्याचीही आपली परंपरा आहे. हे एकत्र येणेच आराधनेचा आनंद द्विगुणित करते. गणेशोत्सवात आपण एकत्र येऊन आरत्या म्हणतो. मनोरंजनाच्या कार्यक्रमांचे आयोजनही होते. सार्वजनिक गणेशोत्सवातील देखाव्यांमधून सामाजिक प्रश्नही मांडले जातात. पण काळाच्या ओघात या मंगल उत्सवाचे स्वरूप काहिसे बदलत चालले आहे. गणेशोत्सव म्हणजे निव्वळ मोठ्या आकाराच्या मूर्ती नव्हे. बाप्पाचे आगमन वाजतगाजत करण्याची परंपरा आहे. परंतु वाजतगाजत म्हणजे हृदयाचे ठोके वाढतील इतका दणदणाट नव्हे. सणासुदीला संगीतामुळे उत्सवी वातावरण निर्माण होते, पण या संगीतामुळे ध्वनिप्रदूषण होणार नाही याची काळजीही खरेच घ्यायला हवी. कुणी आजारी असते, तर कुणाच्या परीक्षा असतात. उत्सवाचे आयोजन हे परिसरातील सगळ्यांसाठी आनंदमयी व्हायला हवे. गणेशोत्सवाची लोकप्रियता वाढते आहे याचा आनंदच आहे. परंतु मूर्तींच्या वाढत्या संख्येमुळे होणारी पर्यावरणाची हानी दुर्लक्षित करून कसे चालेल? आपण मूर्तींचे विसर्जन कुठेही केले तरी अखेरीस सारे सागरातच जाऊन मिसळते हे दर्शवणारे अहवाल पुढे येत आहेत. महासागरांच्या तळाशी जमा होणाऱ्या अनेक घटकांमुळे सागरी जीवसृष्टीला तर मोठी हानी पोहोचतेच. पण अंतिमत: अवघी सृष्टी एका चक्राने परस्परांशी जोडलेली असल्यामुळे पर्यावरणाचा कुठल्याही तऱ्हेचा ऱ्हास हा अखेर मानवाकरिताही संकट घेऊन येणाराच ठरतो. आपण असेच वर्षानुवर्षे पर्यावरणाची हानी करत राहिलो तर संकटात आपले रक्षण करणारा तो बाप्पाही आपल्या मदतीला धावून येऊ शकणार नाही. शास्त्रांनुसारही ही मूर्ती पार्थिव म्हणजे मातीची असणे आणि तिचे पाण्यात विसर्जन करून पर्यायाने ती माती पुन्हा निसर्गात मिसळून जाणेच अपेक्षित आहे. जोवर समाज सकारात्मकतेने याकडे पाहात नाही, तोवर कुठलेच राजकीय नेतृत्व प्लास्टर ऑफ पॅरिससारख्या पर्यावरणास हानिकारक घटकांवरील बंदी बळजबरीने राबवू शकणार नाही. समाजाने म्हणजेच आपण सगळ्यांनी यासाठी स्वत:हून पुढाकार घ्यायला हवा. मूर्ती असो वा सजावटीचे साहित्य, इको-फ्रेंडली म्हणजेच पर्यावरणाचे नुकसान न करणाऱ्या साहित्याचा आग्रह सजग नागरिक करू लागले आहेतच. आता गरज आहे ती त्यांची संख्या वाढण्याची. त्या बुद्धिदात्या गणनायकानेच त्याच्या भक्तांना पर्यावरणाचे रक्षण करण्याची सुबुद्धी द्यावी.**

# चिरनेरचा महागणपती भाविकांचे श्रद्धास्थान

महाराष्ट्र राज्यातील अष्टविनायक गणपती दर्शन आता सर्वदूर प्रसिद्ध झाले आहे. आपल्या राज्यात व देशात अनेक ठिकाणी गणेश मंदिरे आहेत. रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात ऐतिहासिक चिरनेर गावातील भक्तांचे श्रद्धास्थान बनलेले श्री महागणपती मंदिर व त्यातील गणरायाच्या आगळ्यावेगळ्या, भव्य आणि देखण्या रूपामुळे प्रसिद्ध आहे. श्री महागणपती या नावाने तो ओळखला जातो.

चिरनेरच्या या गणपती मंदिराला देशाच्या स्वातंत्र्यासाठी झालेल्या जंगल सत्याग्रहाचा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. गणपती मंदिराच्या शेजारी असलेल्या तलावात ही श्रींची मूर्ती पेशव्यांच्या काळात सापडली. पेशव्यांचे कारभारी सुभेदार रामजी फडके यांच्या कृपेने श्री महागणपतीच्या मंदिराची निर्मिती झाली. त्या वेळचा सभामंडप हा चौपाखी होता. प्रथम नळीची लांबट व त्यानंतर मांगलोरी कौलांचा होता, परंतु तो अतिशय जुनाट झाल्याने भक्तगणांच्या मदतीने हा सभामंडप पाडून, त्या ठिकाणी सिमेंट काँक्रिटचा भव्य सभामंडप बांधण्यात आला.

याशिवाय मंदिराचे बांधकाम पूर्णपणे शास्त्रशुद्ध असून जीर्णोद्धाराच्या वेळी यात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आला नाही.त्यामुळे मुख्य मंदिर पूर्वीसारखेच सुरक्षित आहे. मंदिराच्या समोर तुळशीचे वृंदावन आणि १० फूट उंचीची दीपमाळ आहे. बाजूला स्वातंत्र्यवीरांचे भव्य स्मारक तसेच पुरातन



शिव मंदिर, हनुमान मंदिर व बहिरीदेवी मंदिर असून ही मंदिरेही पूर्वाभिमुख आहेत. चारही मंदिराच्या समोर भव्य असे तलाव असल्याने मंदिर परिसर सुंदर आणि मन प्रफुल्लित करणारा आहे. जाणकारांच्या मते हे महागणपती मंदिर हेमांडपंथीय आहे. मंदिराचे बांधकाम सिमेंट चुनारहित चिरेबंदी दगडाचे असून चिरे प्रचंड आहेत. यातील प्रत्येक चिरा अढी घेऊन बसविण्यात आला असून सांध्यातून शिशांचा रसही ओतला असावा असा अंदाज आहे. देवालयाच्या भिंती दोन मीटर जाडीच्या मजबूत आहेत. मंदिराच्या बाहेरील भिंतीच्या वरच्या आणि खालच्या बाजूस फुलांचे सुंदर नक्षीकाम साधून कमळ पाकळ्यांच्या घुमटाचा आकार घेतला आहे.

त्यामुळे मंदिराच्या गाभाऱ्यात घुमणारे ओंकार व शंखनाद एक वेगळे चैतन्य निर्माण करते. मंदिराचा मुख्य कळस बाहेरून घुमटाकृती असून त्यावर कमळ पाकळयांचा कळस आहे. याशिवाय चारही कोपऱ्यांवर कमळ पुष्प असलेले चार लहान कळस आहेत. श्री महागणपतीची मूर्ती सहा फूट उंचीची व साडेतीन फूट रुंदीची असून मूर्ती पूर्वाभिमुख, डाव्या सोंडेची आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूला निमूळते होत गेलेले दोन खांब व त्यावर महिरपी सप्त कमान आहे. अतिशय लोभसवाणी व अष्टविनायकाचा विचार करता, भव्य असणाऱ्या या महागणपतीची पूजा श्रीमंत पेशंव्यांनी केल्याचा उल्लेख मराठेशाहीत सापडतो.

एकेकाळी मंदिराजवळ राहणारे दिवंगत वामन सोमण यांच्याकडे यापूर्वी पूजेचा बहुमान होता. गणपती देवस्थानच्या नावे असलेल्या मौल्यवान वस्तू त्यांच्याकडे असायच्या. मधल्या काळात सध्या पुजारी असलेल्या पाटील कुटूंबीय यांच्याकडे हस्तांतर झाल्या. दिवा बत्तीच्या व्यवस्थेकरिता देवाच्या नावावर जमीन आहे, ती सध्या पाटील कुटुंबियांकडे आहे.

दरवर्षीच्या उत्सवाची व्यवस्था गावकऱ्यांच्या आणि गणपती देवस्थानच्या मदतीने करण्यात येत आहे. अशा या भक्तांच्या हाकेला धावणाऱ्या आणि नवसाला पावणाऱ्या महागणपती मंदिरात दर संकष्टी चतुर्थीला हजारो भक्तगण चिरनेर महागणपतीला नतमस्तक होत आहेत. भक्तांनी सढळ हाताने दिलेल्या देणगीतून दिलेल्या येथील मंदिराची देखभाल करण्यात येत आहे. या ठिकाणी नित्य शाश्वत पूजा, अभ्यंगस्नान, नेवैद्य आरती, इत्यादी नित्यक्रम योग्यतेने पार पाडण्यासाठी पुजाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. दरवर्षी माघ शुद्ध प्रतिपदा ते पंचमीपर्यंत गणेशोत्सव साजरा केला जातो.




चिरनेर ही भूमी श्रींच्या कृपेने पुनित झालेली आणि देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी २५ सप्टेंबर १९३० रोजी हौतात्म्य पतकरलेल्या शूरविरांमुळे इतिहास प्रसिद्ध ठरलेली आहे. याच भूमीत गणेशोत्सव भव्य स्वरूपात साजरा होतो. चिरनेरचा महिमा हा असाच अभिमानास्पद आहे. महागणपतीच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांमुळे कित्येक स्थानिकांना व्यवसायाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. शेतातील भाजीपाला विकण्याचा व्यवसाय ग्रामस्थ करीत आहेत. अशा या चिरनेर महागणपती मंदिराचे महत्त्व मागील कित्येक वर्षापासून वाढत चालले आहे. भाद्रपद शुद्ध -४ गणेश चतुर्थी निमित्त महागणपतीला नतमस्तक होण्यासाठी अनेक भक्तगण चिरनेर येथे मोठ्या संख्येने दाखल होत आहेत.

**-जीवन केणी,** उरण

# गणपती बाप्पा मोरया.. मंगलमूर्ती मोरया!

भगवान शंकर आणि पार्वतीपुत्र गणपती ही बुद्धीची देवता आहे. संकष्ट चतुर्थीच्या दिवशी आद्य देवता गणपतीची स्थापना करून पूजा केली जाते तसंच हिंदू धर्मात भगवान श्री गणेशाला प्रथम पूजेचा मान आहे.

कोणतेही कार्य असल्यावर सर्वात आधी गणपतीची पूजा केली जाते. कारण गणपती विघ्नहर्ता आहे. गणपतीची अनेक नावं आहेत त्यापैकीच हे एक नाव. विघ्नहर्ता अर्थात संकटाचे हरण करणारा असे आहे. म्हणून प्रत्येक शुभकार्याच्या वेळी सर्वांत आधी गणपतीची पूजा केली जाते. गणेशोत्सवाचा पहिला दिवस असतो गणेश चतुर्थीचा. या दिवशीच प्रारंभ होतो गणेशोत्सवाला. गणेशाच्या आगमनाने सगळीकडेच भक्तीमय वातावरण दिसून येते.

हिंदू कॅलेंडरनुसार भाद्रपद शुक्ल चतुर्थीला गणेशचतुर्थी साजरी केली जाते. गणपती बाप्पाचा जन्मदिवस म्हणून गणेशचतुर्थी साजरी केली जाते. असे मानले जाते की, भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षादरम्यान गणपती म्हणजेच गण+पती = गणपती देवाचा जन्म झाला होता. इंग्रजी कॅलेंडरनुसार हा दिवस ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात येतो. हा दिवस चातुर्मासात येतो. चातुर्मास हे अनेक सणांनी भरलेले महिने आहेत.

पार्वती देवीला स्नानासाठी जावयाचे होते, पण आसपास लक्ष ठेवण्याकरीता कोणीच नव्हते. तेव्हा पार्वती देवीने आपल्या अंगावरील मळाने एक मूर्ती बनवली आणि ती जिवंत केली. या मूर्तीला पहारेकरी नेमले आणि सांगितले की, कोणालाही आतमध्ये येऊ देऊ नकोस. असे सांगून पार्वतीमाता स्नानासाठी आत गेली. भगवान शंकर काही वेळाने तिथे आले आणि ते आत जाऊ लागले. तोच त्या पहारेकऱ्याने त्यांना अडवले. त्यावर भगवान शंकर संतप्त झाले आणि त्यांनी त्या पहारेकऱ्याचे शिर धडावेगळे केले. पार्वतीदेवी जेव्हा स्नान करून बाहेर आली तेव्हा त्यांनी हा प्रकार पाहिला आणि त्या संतापल्या. ते धडावेगळे शिर पाहून तिने पूर्ण ब्रम्हांड हादरवून सोडले. सर्व देव अगदी ब्रम्हदेवापासून सगळे देव पार्वतीची समजूत घालण्याचा प्रयत्न करतात, पण पार्वती कोणाचे काहीही ऐकून घेत नाही. तेव्हा शंकर देव आपल्या गणाला आदेश देतात की, पृथ्वीतलावर जाऊन सर्वात आधी जो प्राणी दिसेल त्याचे शिर कापून घेऊन ये. गण बाहेर पडल्यावर सर्वात आधी त्याला हत्ती दिसला. तो त्याचे शिर घेऊन आला. भगवान शंकरांनी ते शिर पुतळ्याला लावले आणि त्या मूर्तीला जिवंत केले. हा पार्वतीचा मानस पुत्र गज (हत्ती) आनन (मुख) म्हणजेच गजानन होय. शंकर देवाने त्याला गणाचा ईश म्हणेज देव म्हणून गणेश नाव ठेवलं. हा दिवस चतुर्थीचा होता. त्यामुळे चतुर्थीला गणेशचतुर्थी म्हणून महत्त्व आहे.

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर गणेशोत्सव साजरा केला जातो. पेशव्यांच्या काळापासून गणेशोत्सव घरगुती उत्सवाच्या स्वरूपात साजरा करत असल्याचे उल्लेख आहेत. लोकमान्य टिळकांनी ब्रिटीशांच्या काळात समाजातील एकी वाढण्याकरिता या उत्सवाला सार्वजनिक स्वरुप दिले. तेव्हापासून गणेशोत्सव हा घरगुती आणि सार्वजनिकरित्या साजरा केला जातो. महाराष्ट्रासोबतच भारतातही या गणेशचतुर्थी आणि गणेशोत्सव साजरा केला जातो. **(साभार : इंटरनेट)**




# एआय सर्व्हिस, रेल्वे तिकीट बुक करणे झाले सोपे!

आयआरसीटीसीने (IRCTC) देशातील लाखो रेल्वे प्रवाशांसाठी तिकीट बुकिंग सुलभ केले आहे.




आता टाइप न करता आणि लाइनमध्ये उभे न राहता रेल्वे रिझर्व्हेशन करता येणार आहे. इतकंच नाही तर यूजर्स IRCTCद्वारे बोलून ऑनलाइन पेमेंट देखील करू शकतील. यासाठी भारतीय रेल्वेच्या तिकीट बुकिंग प्लॅटफॉर्मने NPCI सोबत भागीदारी केली आहे. IRCTCचा व्हर्च्युअल व्हॉईस असिस्टंट AskDISHA अपग्रेड करण्यात आला आहे आणि त्यात जनरेटिव्ह AI बेस्ड फीचर्स जोडण्यात आली आहेत.

IRCTC, NPCI आणि CoRover यांनी अलीकडेच णझख पेमेंटसाठी कन्व्हर्सेशनल व्हॉइस पेमेंट सर्व्हिस सुरू केली आहे. भारतीय रेल्वेने ही नवीन पेमेंट गेटवे सर्व्हिस आपल्या IRCTC प्लॅटफॉर्मसह इंटिग्रेट केली आहे. रेल्वे तिकीट बुक करण्यासाठी, प्रवासी आपला UPI आयडी किंवा मोबाईल नंबर टाकून पेमेंट करू शकतील. एवढेच नाही तर प्रवाशांना आता बोलूनदेखील तिकीट बुक करता येणार आहे तसेच भारतीय रेल्वेच्या तिकीट बुकिंग प्लॅटफॉर्मवर कॅन्सलेशन, पीएनआर स्टेटस आदींची माहितीही मिळू शकणार आहे.


दरम्यान, IRCTCची ही नवीन सेवा AI बेस्ड आहे. भारतीय रेल्वेने AI व्हर्च्युअल असिस्टंट AskDISHAला नवीन फीचर्ससह सुसज्ज केले आहे. तुम्ही IRCTC वेबसाइट किंवा ॲपवर AskDISHAची मदत घेताच ते तुम्हाला तुमच्या व्हॉइस कमांडद्वारे तिकीट बुक करण्याचा किंवा रद्द करण्याचा ऑप्शन देईल. तिकीट बुक करण्यासाठी, बोर्डिंग आणि डेस्टिनेशन स्टेशन, ट्रेन नंबर, प्रवासाची तारीख, प्रवाशांची नावे इत्यादी माहिती भरल्यानंतर कन्व्हर्सेशनल UPI पेमेंटचा ऑप्शन निवडा.

ही सिस्टम सुरक्षित करण्यासाठी भारतीय रेल्वेने CoRoverचा व्हॉइस इनेबल्ड इहरीरीं GPT पेमेंट गेटवे वापरला आहे. प्रवाशांसाठी कन्व्हर्सेशनल प्रक्रिया सुलभ करण्यासाठी, पेमेंट गेटवे API वापरण्यात आला आहे. युजर्स IRCTCच्या वेबसाइट आणि पवर या चॅटबॉटला ॲक्सेस करू शकतील. दरम्यान, IRCTCची ही नवीन सिस्टम अतिशय सोपी आणि जलद आहे. युजर्स फक्त आपला आवाज वापरून तिकीट बुकिंगची सुविधा घेऊ शकतील. येत्या काळात या सिस्टममध्ये आणखी सुधारणा होऊ शकते.

# क्रांतिकारक उमाजी नाईक

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी घडून आलेल्या रामोशांच्या उठावात क्रांतिकारक उमाजी नाईक यांचे नेतृत्व महत्त्वाचे होते. त्यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिवडी (ता. पुरंदर) येथे झाला. वडील दादजी खोमणे हे पुरंदर किल्ल्याचे रखवालदार म्हणून काम करत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून अनेक किल्ल्यांची राखणदारी या समाजाकडे सोपविण्यात आली होती. उमाजी लहानपणापासून वडिलांसोबत पुरंदरच्या रखवालीचे काम करत. आपल्या वडिलांकडून त्यांनी गोफण चालविणे, तीरकमठा मारणे, कुऱ्हाड चालविणे, भाला फेकणे, तलवार व दांडपट्टा चालविणे इ. कौशल्ये आत्मसात केली होती. उमाजी ११ वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले (१८०२) आणि वंशपरंपरेने वतनदारी त्यांच्याकडे आली.

इंग्रजांच्या सल्ल्यावरून १८०३मध्ये दुसऱ्या बाजीरावाने पुरंदर किल्ला रामोशींच्या ताब्यातून काढून घेण्याचा प्रयत्न केला, या वेळी रामोशींनी कडाडून विरोध केला. त्यामुळे संतापलेल्या पेशव्यांनी रामोशी लोकांचे हक्क, वतने, जमिनी जप्त केल्या. उमाजींनी पेशव्यांच्या या अत्याचाराच्या विरुद्ध संघर्ष केला. उमाजी उत्तम संघटक होते. बरेचशे रामोशी त्यांना आपला नेता मानत होते. गरिबांना लुटणारे सावकार, वतनदार व जमीनदार यांना त्यांनी आपले लक्ष बनविले. गोरगरिबांना लुटून सावकार झालेल्या मुंबईच्या चानजी मातिया या पेढीवाल्याचा



निमित्त

माल उमाजींनी पनवेल-खालापूरजवळ धाड घालून पळविला. तेव्हा उमाजी इंग्रजांच्या हाती लागले व त्यांना एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा झाली. तुरुंगातून सुटल्यानंतर एका दरोड्यात ते पुन्हा पकडले गेले व त्यांना सात वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. कैदेत असताना ते लेखन-वाचन शिकले.

उमाजी खंडोबाचा भक्त होते. त्यांच्या पत्रावर 'खंडोबा प्रसन्न' असे शीर्षक दिसते. त्यांचा भाऊ आमृता याने सत्तू बेरडाच्या नेतृत्वाखाली इंग्रजांचा भांबुर्ड्याचा लष्करी खजिना लुटला (१८२४-२५). या लुटीमध्ये उमाजींची भूमिका महत्त्वाची होती. १८२५मध्ये सत्तू मृत्यू पावल्यानंतर त्याच्या टोळीचे उमाजी प्रमुख झाले. उमाजींविरुद्ध इंग्रज सरकारकडे तक्रारी वाढल्याने २८ ऑक्टोबर १८२६ रोजी इंग्रजांनी त्यांच्याविरुद्ध पहिला जाहीरनामा काढला. यामध्ये उमाजी व त्यांचा साथीदार पांडूजी यांना पकडून देणाऱ्यांना १०० रु.चे बक्षीस जाहीर केले, तर दुसऱ्या जाहीरनाम्यात उमाजीला साथ देणाऱ्यांना ठार मारण्यात येईल, असे जाहीर केले. परिणामी उमाजींनी इंग्रजांविरुद्ध मोहिमच सुरू केली. भिवडी, किकवी, परिंचे, सासवड व जेजुरी भागात त्यांनी लुटालूट केली. त्यामुळे इंग्रज सरकारने उमाजींना पकडण्यासाठी स्वतंत्र घोडदळाची नियुक्ती केली व १५२ ठिकाणी चौक्या बसविल्या, परंतु उमाजी इंग्रजांच्या हाती सापडले नाहीत.

८ ऑगस्ट १८२७रोजी इंग्रजांनी पुन्हा एक जाहीरनामा काढून उमाजींना पकडण्याचे आवाहन केले. जे लोक सरकारला मदत करणार नाहीत, त्यांना उमाजीचे साथीदार समजण्यात येईल असे घोषित केले, मात्र त्याचा उपयोग झाला नाही. इंग्रजांनी जनतेला पैशाचे आमिष दाखवत उमाजींना पकडणाऱ्यास १२०० रु. चे बक्षीस जाहीर केले. या काळात उमाजींचा दबदबा वाढला. त्यांनी न्यायनिवाडा सुरू केला.


८ ऑगस्ट १८३१ रोजी इंग्रजांनी आणखी एक जाहीरनामा काढून उमाजींना पकडून देणाऱ्यास १० हजार रु. बक्षीस व ४०० बिघे जमीन देण्याचे जाहीर केले. या आमिषाला उमाजीचे दोन साथीदार काळू व नाना हे बळी पडले. त्यांनी उमाजींना १५ डिसेंबर १८३१ रोजी स्वतः पकडून इंग्रजांच्या स्वाधीन केले. त्यानंतर इंग्रजांनी उमाजींना पुणे येथे ३ फेब्रुवारी १८३४ रोजी फाशी देण्यात आली.

**(साभार : मराठी विश्वकोष)**

क्लिक...क्लिक...!



पेण : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये भाज्या खरेदीसाठी नागरिकांनी गर्दी केली होती.




# बहुगुणी नारळाचे विविध फायदे जाणून घ्या



नारळ आणि कोलेस्ट्रॉल याबद्दलचे प्रवाद अनेक वर्ष सुरू आहेत. त्यामुळे नारळ आणि त्याबाबतीतले गैरसमजदेखील त्याच वेगाने पसरलेले आहेत. भारतीय आहारात नारळाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मग कोशिंबीर असो किंवा पालेभाज्या. सणासुदीला नारळाचे दूध, ओलं खोबरं सढळ हस्ते वापरलं जातं. अनेक घरात सुंदर केस आणि तंदुरुस्त शरीरयष्टी असणाऱ्या कुटुंबांमध्ये आहारात नारळाचा सर्रास वापर केला जातो.

आहार शास्त्रातदेखील नारळ आणि नारळाच्या पदार्थांचे महत्त्व तितकंच आहे. अगदी नारळ पाणी ते नारळाचं तेल यासारख्या नारळाच्या विविध रूपांचा आहारामध्ये समावेश केला जातो. मधल्या काही काळामध्ये नारळावर एक सरसकट बंदी आली होती. जिथे नारळ खाणे किंवा खोबरं खाणेच किती अपायकारक आहे याबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या जात असत, मात्र आयुर्वेद आणि आहार शास्त्रानुसार नारळ हा अत्यंत औषधी गुणकारी आणि आरोग्यवर्धक आहे. नारळाचं पाणी थंड गुणाचे आहे. शरीरातील अतिरिक्त चरबीला आला घालण्यासाठी नारळपाणी अत्यंत उपयुक्त आहे. किंबहुना सातत्याने स्पर्धात्मक व्यायाम करणाऱ्यांसाठीदेखील नारळपाणी अत्यंत गुणकारी आहे.

शरीरातील क्षारांचे प्रमाण योग्य प्रमाणात राखण्यासाठी आणि आर्द्रता पुन्हा पूर्ववत करण्यासाठी नारळपाणी उपयुक्त आहे. नारळ पाण्यामध्ये ग्लुकोज प्रथिन पोटॅशियम सोडियम क्लोराइड ही सगळी पोषणमूल्य नारळाच्या पाण्याचे महत्त्व वाढवतात. नारळाच्या पाण्यामध्ये जीवनसत्व अ तसंच जीवनसत्व ब याचे प्रमाण उत्तम असते. त्याचप्रमाणे ओल्या खोबऱ्याचा विचार करायला गेला तर त्याच्यामध्ये उत्तम प्रमाणात स्निग्ध पदार्थ असतात तसेच चवीला ते हलके गोड असते. ओल्या खोबऱ्याचे दूध मोठ्या प्रमाणावर पाश्चात्त्य देशांमध्ये आणि भारतात देखील वापरले जाते वेगवेगळ्या प्रकारच्या विशेषतः गोड पदार्थ तयार करण्यासाठी ओल्या खोबऱ्याच्या दुधासारखे उत्तम द्रव्य नाही.

# चिंचवली एकसळ पुलावरून वाहतूक धोकादायक

## पुलाच्या दुरूस्तीची नागरिकांची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील चिंचवली ते एकसळ रस्त्यावरील पुलाचे संरक्षक कठडे अनेक वर्षे गायब आहेत. या पुलावरून रात्रीच्या वेळी वाहन खाली कोसळण्याची भीती असून स्थानिकांनी पुलाची दुरूस्ती करण्याची मागणी केली आहे.

एकसळ गावाच्या प्रवेशद्वाराच्या अगोदरच एक ओहोळ आहे. ओहोळावर असलेल्या पुलाला संरक्षक कठडे राहिले नसल्यामुळे रात्री-अपरात्री एखादे वाहन ओहोळात जाऊ शकते. संबंधित पुलाच्या दोन्ही बाजूंचे डांबरीकरण आणि काँक्रीटीकरण मागील वर्षी सार्वजनिक बांधकाम विभागाने पूर्ण केले आहे. पुलाच्या संरक्षक भिंतीचे काम पूर्ण करून कठडे उभारावेत, अशी मागणी ग्रामस्थ सातत्याने करीत आहेत, मात्र या मागणीकडे दुर्लक्ष केले जात आहे.

पुलाच्या एकसळ भागाकडील बाजूस वळण असून रस्त्याची माहिती नसलेले वाहन त्या ठिकाणी रात्रीच्या वेळी अपघातग्रस्त होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बांधकाम विभागाने पुलाची दुरूस्ती करण्याची गरज ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

**रस्त्याचे काम केले त्या वेळी पुलाचे संरक्षक कठडे बसवून घेण्याची गरज होती, मात्र बांधकाम विभाग अपघात होऊन लोकांचे जीव जाण्याची वाट बघत आहे काय? असा प्रश्न आम्हाला पडला आहे.**

**-द्वारकानाथ बोराडे, ग्रामस्थ**



# श्रीवर्धन शहरात जागोजागी वारंवार फुटताहेत जलवाहिन्या



**श्रीवर्धन : बातमीदार**


शहरातील आंबेडकर चौकामध्ये शुक्रवारी (दि.६) जलवाहिनी फुटून पाणी वाया जात आहे. याकडे नगर परिषद प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

मागील दोन वर्षांपासून श्रीवर्धन नगर परिषदेने जलशुद्धीकरण प्रकल्प व शहरातील जलवाहिन्या बदलण्याचे काम हाती घेतले होते. हे काम एका ठेकेदाराला देण्यात आले होते. दोन वर्षे ठेकेदाराकडून श्रीवर्धन शहरामध्ये ठिकठिकाणी खोदकाम सुरू होते. जलवाहिन्या बदलून झाल्यानंतर टाकण्यात आलेल्या जलवाहिन्या या निकृष्ट दर्जाच्या असल्याचे निष्पन्न होत आहे कारण जलवाहिन्या नवीन टाकल्यापासून जागोजागी त्या फुटून लाखो लिटर पाणी वाया जाण्याचे प्रकार घडत आहेत.

मे महिन्याच्या अखेरपर्यंत संबंधित ठेकेदाराची माणसे श्रीवर्धन शहरामध्ये वास्तव्यास होती. त्यामुळे कोठेही जलवाहिनी फुटली तरी, त्या ठिकाणी रात्री जेसीबी लावून जलवाहिनी दुरूस्त करण्याचे काम केले जात होते. पावसाळा सुरू झाल्यानंतर ठेकेदाराची माणसे निघून गेली आहेत. आता जलवाहिनी फुटल्यानंतर दुरूस्ती कोण करणार? हा प्रश्नदेखील ऐरणीवर आला आहे. अशाप्रकारे पाण्याचा अपव्यय झाला तर उन्हाळ्यामध्ये पाणी टंचाई जाणवण्याची शक्यता नाकारता येत नाही. नगर परिषदेने संबंधित ठेकेदाराकडून जलवाहिन्या का फुटतात? याबाबत विचारणा करून त्या तातडीने दुरूस्त करून घ्याव्यात अशी मागणी शहरातील नागरिकांमधून केली जात आहे.

# माथेरानच्या अमन लॉज स्थानकात रेल्वे प्रशासनाकडून रेस्टॉरंट सुरू

**माथेरान : प्रतिनिधी**



माथेरानमध्ये पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. बहुसंख्य पर्यटक हे अमन लॉज रेल्वे स्थानकात मिनीट्रेनसाठी थांबून राहतात. त्यामुळे वर्दळीचे ठिकाण बनलेल्या अमन लॉज रेल्वे स्थानकात मध्य रेल्वे प्रशासनाकडून रेस्टॉरंट उभारले आहे.

माथेरान पर्यटनस्थळी बाराही महिने पर्यटक गर्दी करून असतात. बहुसंख्य पर्यटक हे नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेनमधून प्रवास करता यावा यासाठी नेरळ किंवा माथेरान स्थानकात थांबून राहतात, मात्र मिनीट्रेनच्या केवळ दोन फेऱ्या जात असल्याने पर्यटक हे माथेरान येथे जाण्यासाठी टॅक्सी पकडून माथेरान दस्तुरी नाका येथे येत असतात.

तेथून माथेरान शहरात जाण्यासाठी शटल सेवा उपलब्ध असून पर्यटक काही वेळ थांबून मिनीट्रेनने जात असतात. त्यासाठी शनिवार रविवार तर पर्यटक हे अमन लॉज स्थानकात थांबून मिनीट्रेनची तिकिटे मिळवत असतात. त्यामुळे अमन लॉज स्थानकात मिनीट्रेनची वाट पाहत असलेल्या पर्यटक प्रवासी यांच्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाकडून रेस्टॉरंट उभारले आहे.

कॅन्टीन स्वरूपातील हे रेस्टॉरंट माथेरान रेल्वे मार्गावरील अमन लॉज स्थानकातील तिकीट घराच्या समोर उभारले असून पूर्वी पर्यटकांसाठी वेटिंग रूम म्हणून उभारण्यात आलेल्या खोलीचा वापर आता व्यवसायिक कारणासाठी केला जाणार आहे. त्या ठिकाणी आता रेस्टॉरंट उभारले जाणार असल्याने पर्यटकांची व्यवस्था होणार आहे.

## पाली भुतवली लघु पाटबंधारे योजना

### कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ (बां),

### जाहीर नोटीस

**क्रमांक:- उविअ/भूसं./कात-१/पा.भु.ल.पा.योजना/डिकसळ-रस्ता/जा.नो./२०२४, दिनांक ०५/०९/२०२४**

ज्याअर्थी पाली भुतवली लघु पाटबंधारे योजना मौजै डिकसळ गावातुन पल्याण धरणाकडे जाणारा पोहोच रस्त्यासाठी मौजे डिकसळ ता. कर्जत जि. रायगड येथील जमिन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी करणेबाबत शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रं. संकिर्ण-०३/२०१५प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ पाली भुतवली लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी दिनांक ०६ डिसेंबर २०१६ मधील तरतुदी अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ (बां) कोकण भवन नवी मुंबई यांचेव्दारे व यांचे नाव घेणेबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

आणि त्याअर्थी, जिल्हाधिकारी रायगड यांचे आदेश क्र. भूसंपादन/टे-६/२१५६२८० /मौजे डिकसळ/२०२४ दिनांक २४/०७/२०२४ अन्वये उक्त प्रस्तावासंबधी शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तनुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र.एल.क्यू.एन. ०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ व शासन शुध्दीपत्रक दिनांक २७ नोव्हेंबर २०१७ अन्वये कार्यवाही करणेची आहे. त्या अर्थी आता,

आणि त्याअर्थी, जिल्हाधिकारी रायगड यांचे आदेश क्र. भूसंपादन/टे-६/२१५६२८० /मौजे डिकसळ /२०२४ दिनांक २४/०७/२०२४ अन्वये उक्त प्रस्तावासंबधी शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तनुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र.एल.क्यू.एन. ०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ व शासन शुध्दीपत्रक दिनांक २७ नोव्हेंबर २०१७ अन्वये कार्यवाही करणेची आहे. त्या अर्थी आता,

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी श्री. प्रकाश संकपाळ, उपविभागीय अधिकारी कर्जत या व्दारे,

अ. अनुसुची-एक मध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्रमांक ०२ (बां), कोकण भवन, नवी मुंबई यांच्याव्दारे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

ब. प्रकल्पासाठी जमिन थेट खरेदी करताना जिल्हा स्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेडयूल-१ च्या तरतुदीनुसार संपादित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देवून, मोबदला निश्चित करण्यात येईल.

क. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणांप्रमाणे खाजगी वाटाघाटीव्दारे कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्रमांक ०२ (बां), कोकण भवन, नवी मुंबई यांचे व्दारे खरेद्री देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

२. संबधित भूधारकांनी हि जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी कर्जत यांचेकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी कर्जत यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत भुधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी कर्जत यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबधित व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

### मिळकतीचे वर्णन

तालुका :- कर्जत | जिल्हा :- रायगड

| अ.क्र. | गावाचे नाव | स.नं./हि.नं./ग्रा.पं./घर/ मालमत्ता क्रमांक | | क्षेत्र हे. आर./पो.ख. | खरेदी करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | डिकसळ | १५ | १८/ब/२ | ०.२००० | ०.१२३० |
| २. | डिकसळ | १५ | १८/१/अ | ०.५००० | ०.१२०० |
| ३. | डिकसळ | ११ | १/अ/१ | ०.१२०० | ०.०८१० |
| ४. | डिकसळ | ९ | २/अ/३ | ०.१३०० | ०,०३४० |
| ५. | डिकसळ | ९ | ब/८ | ०.०४३० | ०.०४३० |
| ६. | डिकसळ | ९ | ब/३ | ०.०२७० | ०.०२७० |
| | | एकुण | | १.०२०० | ०.४२८० |

**दिनांक : ०५/०९/२०२४**
**ठिकाण : कर्जत**

**सही/**
**(प्रकाश संकपाळ)**
**सक्षम प्राधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी कर्जत**

**क्र.जिमाका/राआ/जाहि/८०/२०२४-२०२५**

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ३३/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | शहापूर धेरंड औद्योगिक क्षेत्र... मोठे शहापूर, धाकटे शहापूर व धेरंड या गावांना पायाभूत सुविधा पुरवणे | ₹ ६,७३,९५,५६७.०० |
| २ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र.... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील विविध ठिकाणी आरसीसी गटर व नाल्यासह सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे.. औद्योगिक परिसरातील विविध ठिकाणी पाणीपुरवठा पाईपलाईनचे स्थलांतर करणे. | ₹ ९१,३९,५०३.०० |
| ३ | अलिबाग विभाग...अलिबाग विभागीय कार्यालयातील जुने वाहन क्रमांक एमएच -०६- बीएम-५४०१ (मारुती स्विफ्ट डिझायर एलएक्सआय) चा लिलाव "जसे आहे तिथे आहे" या तत्वावर करणे. | ₹ ३,२६,०२२.०० |
| ४ | जुन्या व नवीन पाताळगंगा पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...ॲल्युमिना फेरिकचा (लिक्विड तुरटी ग्रेड ५) पुरवठा करणे. | ₹ ३६,५७,५००.०० |
| ५ | रानसाई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... रानसाई पाणीपुरवठा योजनेच्या ९०० मि.मी. व ६०० मि.मी. व्यासाच्या पाणीपुरवठा जलवाहिनीची एक वर्षाच्या कालावधीसाठी वार्षिक तत्वावरर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३५,४९,८९६.०० |
| ६ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती...... कुंडलिका नदीतील जलप्रदूषण टाळण्यासाठी कॉफर डॅम बांधणे व सांडपाणी मिश्रीत पाणी, सांडपाणी संकलन चेंबरमध्ये सोडणे. | ₹ १५,४३,६८०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०६/०९/२०२४ ते दिनांक १७/०९/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १०/०९/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ११/०९/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

ई निविदा सूचना क्र. २७/२०२४-२०२५ (मुंबई) करीता

दिनांक २२/०८/२०२४ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक खबरें आजतक, मुंबई, दैनिक वृत्तमानस, मुंबई, दैनिक रामप्रहर, मुंबई, दैनिक सागर, रत्नागिरी या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता कंत्राटदारांचे प्रश्न, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलास व ई निविदा संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | अलिबाग विभागासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... नागोठणे जॅकवेल ते आरसीएफ कंपनी दरम्यानच्या सेवा रस्त्यावरील पुलांचे मजबुतीकरण व दुरुस्ती एफआरसीएम प्रक्रिये सह करणे. | ₹ १९,१९,३०,१०५.०० |
| २ | जुनी पाताळगंगा पाणीपुरवठा योजना...शुद्ध जलउदंचन केंद्रातील सबस्टेशनच्या मजबुतीकरणासह नव्याने बांधलेल्या संप पंप हाऊसमध्ये एलटी पॅनेल व ईओटी क्रेनसह पंपिंग मशिनरी स्थलांतरित करणे व अनुषंगिक कामे करणे. | ₹ ११,९८,९६,३२८.०० |
| ३ | रानसाई पाणी पुरवठा योजना.... रानसाई येथे १५० अश्वशक्ती विलो बनावटीच्या ३ नग व्हीटी पंपांचे नूतनीकरण करणे, बॅकवॉश पंपिंग मशिनरीचा पुरवठा करून उभारणे, कार्यान्वित करणे व संलग्न कामे करणे. | ₹ ८,७०,४८,९९०.०० |
| ४ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र.... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... पाताळगंगा येथील कर्मचारी निवासस्थानांना एचडीआरए संरक्षणात्मक कोटिंग प्रक्रिया करणे. | ₹ ८५,८३,१४४.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १७/०९/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामांबाबत दिनांक १०/०९/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १२/०९/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# सायबर फसवणूक टाळण्यासाठी सतर्क राहणे गरजेचे -ॲड.पंकज बाफना



विविध क्षेत्रांमधील अधिकारी, पदाधिकारी आणि तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती 'रामप्रहर'च्या संवादप्रहर सदरामध्ये दर शनिवारी प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. यामध्ये मान्यवर आपले विचार, मते आणि माहिती मांडणार असून विविध घडामोडींबद्दल भाष्य करतील. वाचकांसाठी हे सदर माहितीपूर्ण आणि उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे. आजच्या मुलाखतीत सायबर क्राईम कायदेतज्ज्ञ ॲड. पंकज बाफना यांच्याशी संवाद साधला आहे.

राम प्रहर संवादप्रहर

**सायबर क्राईममध्ये आपली फसवणूक होऊ नये यासाठी काय काळजी घेतली पाहिजे?**

सायबर क्राईम ही काही जादू नाही. या मागे एक माणूस असतो. कोव्हिडमध्ये आपण काळजी घेतली म्हणून आपण आज येथे आहोत. महाशक्ती असलेल्या देशात मोठ्या प्रमाणात मृत्यू झाले. आपण काळजी घेतल्याने आपल्याकडे त्याचे प्रमाण कमी होते, तसेच सायबरमध्ये तुम्ही स्वत: काळजी घेणे आवश्यक आहे कारण ते आरोपी कोठे बसले आहेत ते आपल्याला माहित नसते. ते कोणती मशिनरी वापरणार आपल्याला माहित नसते. त्याचे अधिकार क्षेत्र कोणते, प्रत्येक ठिकाणचे वेगळे कायदे आपल्याला माहित नाहीत. त्यामुळे त्याला बळी पडू नये यासाठी वेबसाईटवर जाताना काळजी घेतली पाहिजे. कशासाठी त्या ॲप्लिकेशनमध्ये जाता, त्याची आपल्याला गरज आहे का? याची खात्री केल्यावरच ते ॲप डाऊनलोड केले पाहिजे.

**ॲप्लिकेशनमध्ये जाताना किंवा ॲप डाऊनलोड करताना कोणती काळजी घेणे आवश्यक आहे?**

आज आपण बघतो २० वर्षांचा किंवा ५० वर्षांचा माणूसही पेमेंट करण्यासाठी पेटीएम, फोन पे, गुगल पे वापरतात. आपल्याला सगळे पाहिजे असते. मोबाईलमध्ये खरे तर यूपीआय पेमेंट आहे. कुठूनही पेमेंट केले तरी जाणार आहे. शासन त्यासाठी जाहिरातही करीत असते. मग तुम्हाला तीन-चार ॲप्लिकेशनची गरज काय? त्यांच्या योजना असतात, आमच्याकडून पेमेंट केलेत की १०-१५ रुपये परत मिळणार. त्या यासाठी तुम्ही तुमच्या कुटुंबात दोन माणसे राहत असतात तिथे १० जणांना प्रवेश देता. खरे तर ही ॲप्लिकेशन आहेत, प्लगईन नाहीत. ते डाऊनलोड करताना त्यांना सगळ्या परवानगी देता. आपल्याकडे त्यासाठी कायदा नाही की, तुम्ही कशासाठी परवानगी दिलीत. त्यामुळे तुम्ही डाऊनलोड केलेत की तुमच्या मोबाईलमधील सगळी माहिती समोरच्या कंपनीकडे जाते. मग तुम्ही म्हणता माझे पैसे कसे गेले, अरे तुमच्या ॲप्लिकेशनमध्ये नको असलेली माणसे बसलेली आहेत. त्यांना पहिले काढून टाका.

**ऑनलाइन गुंतवणूक करताना काय काळजी घेतली पाहिजे?**

पहिल्यांदा तुमच्या डोक्यातील ऑनालाईन पैसे गुंतवणुकीबाबतच्या गोड कल्पना काढून टाका. कुठेही १० रुपयांचे महिन्यात १०० रुपये होत नाहीत. आज माझ्याकडे किंवा पोलिसांकडे येतात त्यातील अनेक जण सुशिक्षित असतात ज्यांनी आपली घरे विकूनही स्टॉक मार्केटमध्ये गुंतवून कोट्यवधी रूपयांना फसलेत. तुम्हाला स्टॉक मार्केटमध्ये पैसे टाकायचे आहेत तर सेबीचे अधिकृत एजंट आहेत. तुमचा वेल्थ व्यवस्थापक असेल त्याच्या मार्फत करा. व्हॉट्सअ‍ॅप, फोनवर मेसेज आला की, तुम्ही पैसै टाकता. तुम्हाला स्क्रीनवर पैसे डबल झालेले दिसतात, पण खरे कधी कळते? ज्या वेळी तुम्ही पैसे काढायला जाता तेव्हा तो त्याचे रंग दाखवतो. तुमचे पैसे काढण्यासाठी आमची एवढी फी भरा. त्या वेळी तुम्हाला आपण फसल्याचे कळते. तुम्ही त्यांना एकाच वेळी पैसे दिलेले नसतात. दोन-तीन महिन्यांत दहा-पंधरा वेळा पैसे दिलेले असतात. पहिल्याच वेळी तुम्ही सावध व्हा. असे काही करू नका. मी डॉक्टर, वकिल किंवा सनदी लेखापाल आहे. मला कोण फसवणार नाही असे काही नसते. मुख्य गुन्हेगारापर्यंत पोलीस पोहचूच शकत नाहीत कारण आमच्याकडे पायाभूत सुविधा नाहीत, तंत्रज्ञान नाही. ज्यांच्याकडे आहे ते तुमच्याकडून भरमसाठ फी घेणार ती परवडणारी नाही. त्यामुळेच भारताला टार्गेट केले जाते. तुम्ही लालची बनला नाहीत, तर गुन्हेगार काहीच करू शकणार नाही हे लक्षात घ्या.

**सायबर गुन्हा दाखल करण्याची पोलीस स्टेशनची पद्धत कशी आहे?**

प्रथम तुम्हाला तुमच्या एरियाचे पोलिसांचे अधिकार क्षेत्र माहिती पाहिजे. तेथे जाऊन किवा ऑनलाइन पोर्टलही आहेत. तेथे तक्रार करा, पण लगेच रिझल्ट्ची अपेक्षा करू नका. अमेरिकेतही होत नाही तर आपल्याकडे कसे होईल? पोलीस स्टेशनमध्ये तुमच्यासारखे आणखी १० लोक बसलेले असतात. तुमचे पुरावे बँक स्टेटमेंट व व्हॉट्सअ‍ॅप चॅटचे प्रिंट आऊट घेऊन जा. ड्युटी ऑफिसर तुमची तक्रार घेऊन तुमचे पैसे वाचवण्यासाठी तुम्ही ज्या खात्यात पैसे टाकलेत ती सील करतात. ती कोणाची आहेत याची माहिती घेऊन फाईल बनवून सीनियर ऑफिसरला देतात. ते त्याचा अभ्यास करून त्यांच्या वरिष्ठांना देतात. त्यांनी परवानगी दिली की, तुमचा एफआरआय होतो कारण काही वेळा बँक लोन घेऊन मग सायबर फ्रॉड झाल्याची तक्रार काही जण करतात. म्हणून पोलीस खात्री करतात. तुमचे पैसे वाचवण्यासाठी खाते ब्लॉक करतात. नेहमी दिसते की, लोकांना फक्त त्यांचे पैसे हवे असतात, गुन्हेगार नको असतात. त्यांना पकडा तो आणखी कोणाला फसवेल, असे म्हणणारा एकही सापडत नाही. ते सांगतात साहेब मला माझे पैसे मिळवून द्या. पोलीस काही वसूली एजंट नाहीत.

**सायबर गुन्हा नोंदवताना पैसे पाहिजेत की, आरोपी असा चॉइस असतो का?**

चॉइस नाही पण त्याचा कायदा आहे. त्यामुळे मी नेहमी त्या व्यक्तीला सांगतो,



तुम्हाला काय पाहिजे ते लेखी घेऊन जा पोलीस स्टेशनमध्ये आणि पोलिसांनाही त्यांच्या प्रशिक्षणाचे वेळी सांगतो कारण गुन्हेगाराला अटक केले की, नंतर तक्रारदार पोलीस स्टेशनला व कोर्टात येतच नाहीत. त्यामुळे पोलीस आणि कोर्टाचा वेळ वाया जातो. पैसे परत हवे असतील तर दिवाणी. पोलीस फौजदारी घेणार त्याचा तपास करणार कारण त्यामध्ये शिक्षा आहे. तुम्हाला फक्त पैसे हवे असतील तर सायबरमध्ये दिवाणी कोर्टात दावा दाखल करू शकता. पैसे कसे गेले हे तुम्हाला पुरावे देऊन सिद्ध करावे लागते की, तुमच्या चुकीने गेले नाहीत कारण अशा पण केसेस आहेत. तुम्ही शुक्रवारी रात्री झोपलेले असताना मोबाईल बंद असतो. सोमवारी तुमच्या खात्यात पैसेच नसतात. तुम्ही ओटीपी किंवा युजर आयडी शेअर केलेला नाही. तिकडे आरबीआयचे नियम आहेत. ते पाळले पाहिजेत. आता सायबर विमा आपल्याकडे पण सुरू झाला आहे. तुमची शिल्लक सरासरी किती असते तेवढा विमा काढावा. विमा कंपनी तुम्हाला नुकसान भरपाई देते.

**सायबर क्राईममध्ये पैसे गेले तर कोणता चॉइस घेतला पाहिजे?**

हे मी सांगू शकत नाही, पण आयटी ॲक्टमध्ये सिव्हिल रेमडीज पण आहे. तुमची फसवणूक झाली, तुमच्या परवानगीशिवाय तुमचे पैसे गेले तर तुम्ही आयटी ट्रिब्यूनलकडे अर्ज करून तुमची रक्कम व तुमचा खर्च मागू शकता. त्यासाठी पोलीस केस दाखल करावी लागत नाही. दुसरे एफआरआय सक्तीचा नाही. तुम्ही फक्त एक अर्ज पोलिसांना द्या. त्यांना कळवल्याची पोच घ्यायची. आता त्याचीही गरज नाही. ऑनलाईन केंद्र सरकारच्या पोर्टलवर नोंदवू शकता. त्याचा टोकन नंबर मिळतो. तोच एफआरआय समजला जातो.

**सायबर क्राईममध्ये पोलिसांचा तपास कसा चालतो?**

पोलीस प्रथम बँकेच्या नोडल अधिकाऱ्यांना कळवतात आणि ज्या खात्यात पैस आलेत ते फ्रिझ करायला सांगतात. त्या वेळी त्या खात्यात जेवढी रक्कम असेल तेवढीच फ्रीझ होणार. गुन्हेगार एक खाते १०० केसमध्ये वापरतात. यामध्ये फसणारा एक दिल्ली, दुसरा जबलपूर तर तिसरा मुंबईत असतो. त्यांचे पैसे त्याच खात्यात गेलेले असतात. तिघांचे प्रत्येकी एक लाख गेले, त्यातील दोन लाख ९० हजार काढलेले असतात. दहा हजार कोणाचा क्लेम होणार? तुम्ही कोर्टात गेलात तिन्ही कोर्ट क्लेम मंजूर करतात. मग बँक ते कोणालाच देत नाही. ते पैसे असेच पडून राहतात. आरबीआयकडे एक हजार कोटी रुपये असे पडून आहेत कारण कोणाला द्यायचे? असा प्रश्न आहे.

**पोलीस मुख्य गुन्हेगारापर्यंत अनेकदा पोहचत नाहीत याचे नेमके कारण काय?**

हे खरे आहे. माझ्या एका केसमध्ये चेन्नईमध्ये गॅस सिलेंडर डिलिव्हरी करणारा होता. त्याच्या मुलीचे लग्न होते. तो लग्नासाठी १० लाख कर्ज घेण्याचा प्रयत्न करीत होता. गाव छोटे असल्याने सगळ्यांना हे माहित होते. एका व्यक्तीने त्याच्याशी संपर्क करून त्याला सांगितले, 'माझा एक परदेशात आहे मित्र आहे. त्याचे ८० लाख असेच पडले आहेत, ते तुझ्या खात्यात ठेव. त्यातले दहा लाख तू वापर तो आला की, त्याला परत कर.' त्याला आनंद झाला तो तयार झाला. त्याच्या खात्यात ८० लाख आले. त्या मध्यस्ताने त्याचा एक चेक घेतला. दोन दिवसांनी आपला मित्र आला आहे, त्याला ७० लाखांची अर्जंट गरज आहे. ते तू काढून दे १० लाख तुला ठेव, असे संगितले. त्याला आरबीआयचा नियम माहित नाही. त्याने स्वत:चे खात्यातून ७० लाख काढून दिले. सीसीटीव्हीमध्ये तोच आला. त्याने बाहेर जाऊन त्या व्यक्तीला पैसे दिले. ती व्यक्ती पैसे घेऊन गेली. ८० लाख सरकारी संस्थेचे पैसे त्याच्या खात्यात आले होते. त्यांनी सायबर पोलिसांकडे तक्रार केली. याला ट्रेस केला, पोलिसांनी त्याला अटक केली. त्याला काय झाले माहितच नाही. दीड वर्षे त्याला जामीन मिळाला नाही. कोर्टाने ८० लाख तुमच्या खात्यात आलेत तुम्ही ८० लाख परत करा. त्याने घर विकले, दागिने विकले, मुलीच्या सासूचे दागिने विकले. यामध्ये खरे तर शासकीय संस्था आणि गॅसवाला दोघेही फसले होते. त्याच्याकडे त्या नजरेने बघा पण पोलीस अधिकाऱ्याला आपल्या वरिष्ठांना दाखवायचे असते मी गुन्ह्याचा तपस केला, आरोपीला अटक केली. ही पोलिसांची चूक आहे. मी त्यांना प्रशिक्षणाचे वेळी सांगतो तसे करू नका. तुमच्या खात्यातही उद्या कोणी पैसे टाकले तर तुम्ही ही गुन्हेगार व्हाल. तुम्ही बघा तो व्यक्ती कोण आहे, बँकेच्या बाहेरचे पण सीसीटीव्ही फुटेज बघा ना, पण तुम्हाला काय दाखवायचे आहे, सायबर क्राईम झाला एकाला अटक झाली, पण यामध्ये तुम्ही लोकांना उल्लू बनवता. पोलिसांना शेवटपर्यंत जायचेच नसते कारण पोलिसांकडे तंत्रज्ञानाची कमी आहे. सॉफ्टवेअर नाही यामुळे असे होते. ज्या देशात ते आहेत तेथे मंत्र्यांचे कॉन्टॅक्ट वापरा. आंतरराष्ट्रीय पातळीवर जा कारण फक्त भारतातच असे घडत नाही. सगळ्या देशात हे घडत आहे. दुबईमध्ये कडक कायदे असून तेथेही आहे. अमेरिकेत सगळ्यात जास्त गुन्हे घडतात.

**सायबर क्राईम होऊ नये यासाठी पोलिसांनी लोकांना त्याची माहिती देणे गरजेचे आहे का?**

गरज सगळ्यांनाच असते. एका घरात सहा माणसे असली त्यांना खाते उघडण्यासाठी प्रत्येकी दोन हजार दिले तर १२ हजार मिळतात. सायबर क्राईम होऊ नये यासाठी मोठ्या श्रीमंत वस्तीत जाऊन जागरूकता कार्यक्रम करतात, पण झोपडपट्टीत, गरीब वस्तीत जाऊन करीत नाहीत. खरे, तर त्यांना जाऊन शिकविणे गरजेचे आहे.

**फसणाऱ्या गरीब व्यक्तींसाठी काय करायला हवे?**

मी नेहमीच यासाठी प्रयत्न करीत असतो. न्यायाधीशांनाही मी विनंती करीत असतो. तपासाची पद्धत अभ्यासली पाहिजे. सायबर गुन्हा कसा केला जातो त्याची पद्धत असते, त्याचा अभ्यास करा. मग त्याला जामीन हवा की नको ठरवा. आता सर्वोच्च न्यायालयाने अशा गुन्ह्यात जामीन देण्यासाठी काही मार्गदर्शक अटी बघायला सांगितल्या आहेत. पाच-दहा हजारच्या लालसेपोटी ते अडकले गेले आहेत, पण तुम्ही बघा ते कोण आहेत ते महाविद्यालयीन विद्यार्थी आहेत. ते जेलमध्ये राहून अट्टल गुन्हेगार बनून बाहेर येणार आहेत. तुम्ही त्यांना गुन्हेगारीच्या स्कूलमध्ये पाठवता. त्यांना जागरूक करा. लगेच मिळणाऱ्या पैशाच्या हव्यास करू नका. यामध्ये दोघांचाही लोभीपणा असतो. सर्वांत प्रथम गुगलमध्ये काही लगेच टाकू नका. ते कोणतीही जबाबदारी घेत नाही. ॲमेझॉनमध्ये गेलात तर खाली डाव्या बाजूला त्यांचे आयपी बघा ते भारतातील आहेत की, बाहेरचे आहेत? मी तुम्हाला सुचवतो की, शक्यतो वोलेट पेमेंट किवा कॅश ऑन डिलीव्हरी घ्या, पण लोकांकडे वेळ नाही. नंतर द्यायचे तर आताच देऊ म्हणतात, पण ज्या वेळी डिलीव्हरी देणारा तुम्हाला बारकोड दाखवतो तो त्याचा स्वत:चा असेल तर करू नका. ॲमेझॉनचा किंवा डिलरचा बारकोड पाहिजे तरच करा.

**सायबर क्राइमसंदर्भात लोकांनी काय काळजी घ्यायला हवी?**

तुमचे बँक खात्याची माहिती फोनमध्ये ठेऊ नका कारण तुम्ही सोशल मिडियाची ॲप डाऊनलोड करताना सगळी परवानगी देता. त्यामुळे तुमची सगळी माहिती, तुम्ही केले व्यवहार त्यांच्याकडे जाते. तुमच्या मोबाईलमध्ये सोशल मिडिया ॲप असेल आणि बँक खात्यातून तुम्ही पेमेंट केलेत की, तुमचे युजर नेम आणि पासवर्डही त्यांचाकडे जातो. मग तिकडून ते क्राईम करतात. तुम्हाला वाटते अरे मी तर काहीच केले नाही मग पैसे गेले कसे? म्हणून सेपरेट ठेवा. पब्लिक वायफाय वापरू नका. आता इंटरनेट स्वस्त झाले आहे. बँकखात्याचा वापर करताना सोशल मीडिया सेटिंगमध्ये जाऊन बंद करा किंवा स्लिप मोडमध्ये टाका आणि मग व्यवहार करा.

## निवडक




### चक्रधर स्वामी जयंतीनिमित्त अभिवादन

**नवी मुंबई :** शांती, समता व अहिंसा यांची शिकवण देणारे महानुभाव पंथाचे आद्य प्रवर्तक भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतारदिन जयंतीनिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. या वेळी समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात व विलास मलुष्टे आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### अर्थ सावंतला पुरस्कार



**उरण :** उरणमधील अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे, तसेच उत्तम व नेत्रदीपक कामगिरी उरणच्या अर्थ केतन सावंत यांनी केल्याने त्याला राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अर्थ सावंत याने स्केटींग या खेळामध्ये उत्कृष्ट कामगिरी बजाविल्यामुळे हॉकी लिजेंड पद्मभूषण मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ने सन्मानित करण्यात आले. त्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# पनवेल, उरणमध्ये ५५ हजार ७७८ गणरायांचे होणार आगमन

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वात मोठा उत्सव म्हणून ज्या गणेशोत्सवाचा उल्लेख केला जातो. त्या गणपती बाप्पांचे आगमन शनिवारी (दि.७)होणार आहे. पनवेल आणि उरणमध्ये यावर्षी तब्बल ५५ हजार ७७८ बाप्पा विराजमान होणार आहेत. यात ५५ हजार ३९५ खासगी गणपती आणि ३८३ सार्वजनिक गणपतीचा समावेश आहे.

उरणमधील मोरा, न्हावाशेवा आणि उरण या तीन पोलीस ठाणे हद्दीत दहा हजार ३२४ खासगी गणपती बाप्पा तर ३६ सार्वजनिक गणपतीचे आगमन होणार आहे. पनवेल तालुका आणि पनवेल महापालिका अशा एकूण सात पोलीस ठाण्याच्या हद्दीत ४५ हजार ४१८ खासगी आणि सार्वजनिक बाप्पांचे आगमन होणार आहे. यात ३४७ सार्वजनिक गणपती आणि ४५ हजार ७१ खासगी बाप्पांचा समावेश आहे.



सर्वांनाच अगदी हवाहवासा वाटणाऱ्या लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन शनिवारी होत आहे. गणेशचतुर्थीचा उत्सव संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. घरोघरी आणि सार्वजनिक मंडळामध्ये १० दिवस हा उत्सव मोठ्या जल्लोषात सुरू राहतो. दरम्यान, बाप्पाच्या भव्य मूर्ती स्थापित केल्या जातात, ज्याची भव्यता पनवेल-नवी मुंबईत सर्वात जास्त दिसते. घरगुती गणरायाचा मुक्काम हा दीड दिवस, तीन दिवस, कुठे पाच दिवस, तर कुठे दहा दिवसही असतो, मात्र मोठ्या मंडळातील गणपतींचा मुक्काम १० ते ११ दिवसांचा असतो. हा दहा दिवसांचा मुक्काम प्रत्येकासाठी वर्षभराचा आनंद व ऊर्जा देऊन जातो. केवळ हिंदूच नव्हे, तर सर्वच धर्मातील नागरिक या उत्साहात सहभागी होतात आणि गणेशाची मनोभावे पूजा-अर्चा करतात. यातून धार्मिक एकोपाही जपला जातो.

बाप्पाच्या आगमनाला घरातील मंडळी तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील सदस्य आतुर झाले आहेत. विद्येची देवता म्हणून गणेशाचे नमन केले जाते. गणेशोत्सव अवघ्या एका दिवसावर येऊन ठेपल्याने सर्वत्र बाप्पांच्या स्वागताची लगबग सुरू आहे. जातीपातीला थारा न देता पनवेलमध्ये सार्वजनिक गणेश मंडळांकडून दरवर्षी वेगवेगळ्या प्रकारे गणेशोत्सव साजरा केला जातो. गणेशोत्सवामुळे शहरात उत्साहाचे वातावरण आहे. गणेशोत्सवानिमित्ताने शहरातील विविध सार्वजनिक मंडळात देखावे निर्माण केले गेले आहेत.

# पी.एम.श्री. शाळेत शिक्षक दिनासह ईकोफ्रेंडली गणपती कार्यशाळा उत्साहात

**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील मुळेखंड येथील पी.एम. श्री. शाळेत गुरुवार (दि.५) शिक्षक दिनासह ईको फ्रेंडली गणपती तयार करण्याची कार्यशाळा उत्साहात झाली.



या कार्यशाळेची सुरुवात पर्यावरण संवर्धनाबाबत प्रबोधन पं. स. यांनी साधन व्यक्ती सोनल पाटील व प्रतिभा तायडे यांनी केले. शाळेतील दिव्यांग मुलांसोबत इतरही मुलांकडून शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती बनवून घेण्यात आल्या. काही मुलांनी विविध रंगाचे तेलखडू, विविध डाळी, तांदूळ व पिंपळाची पाने आणून गणपती तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. बऱ्याच मुलांनी आपल्या अंगी असणारे कला कौशल्य ओतून सुंदर अशा गणपती मूर्ती बनवल्या.

या कार्यशाळेबरोबरच इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून इयत्ता पहिली ते सहावीपर्यंतच्या वर्गावर जाऊन अध्ययन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांना शिक्षक दिनानिमित्त भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन कृतज्ञता व्यक्त केली. या दोन्ही उपक्रमांसाठी शाळेचे मुख्याध्यापक राघो पाटील, विद्या वाणी, अमृत ठाकूर, दिशा तांडेल, संजय होळकर, अर्चना पाटील यांनी मेहनत घेतली.



**पनवेल : गणेशोत्सवानिमित्त भाजपचे कामोठे शहर मंडल सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, मंडल सचिव दामोदर चव्हाण, दक्षिण रायगड सोशल मीडिया संयोजक सुशीलकुमार शर्मा यांनी प्रसिद्ध केलेल्या आरती संग्रहाची प्रत माजी सभागृह नेते परेश ठाकूर व शहर अध्यक्ष अनिल भगत यांना देण्यात आली.**

# उंबरखिंडीच्या इतिहासाला मिळणार उजाळा

## शिवरायांचा धनुर्धारी पुतळा आणि सुशोभिकरणासाठी ५३ कोटींचा निधी

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील शेंमडीफाटा येथील उंबरखिंडीत १६६१मध्ये पराक्रम घडला होता. ३६३ वर्षापूर्वी अंबानदीच्या या खोऱ्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी गनिमी काव्याने कारतलखान उझबेग आणि रायबाघन पाटील यांच्यासह आलेल्या मुघल सैन्याला कोणत्याही मराठा सैनिकाचा बळी न जाता विजय मिळविला होता. त्या उंबरखिंडीमध्ये राज्य सरकार शिवराजांचा धनुर्धारी पुतळा उभा करणार आहे. दरम्यान, या परिसराचा विकास साधण्यासाठी शासनाने तब्बल ५३ कोटींची तरतूद केली आहे.

२ फेब्रुवारी १६६१ म्हणजे ३६३ वर्षांपूर्वी उंबरखिंडे ठिकाण छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झाले. अंबानदीच्या खोऱ्यात आणि सह्याद्रीच्या घेऱ्यात सर्व मावळ्यांची साथ यामुळे महाराजांनी गनिमी काव्याने कारतलबखान उझबेग व रायबाघन पाटील आणि त्यांच्यासमवेत असलेल्या मुघल सैन्याला अक्षरशः लोळवले. कारतलबखान उझबेग हा नोकरीनिमित्त जरी मुघलशाहीत सरदारकी करत असला तरी तो आजच्या उझबेकीस्तानातला होता, तर रायबाघन पाटील ही स्त्री होती माहूरची! जिथे आपल्या आजच्या साडेतीन शक्तीपीठातील रेणुका माता आहे. त्यांचे खरे नाव सावित्रीबाई उदाराम देशमुख. तिचा पती औरंगजेबाच्या सैन्यात त्याची सेवा करताना मेला म्हणून ही त्याच्या जागी रुजू झाली आणि पराक्रमाच्या जोरावर पातशाहाची वाघीण, पातशहा म्हणजे राया आणि वाघीण म्हणजे बाघन म्हणजेच रायबाघन अशी पदवी तिला मिळाली.

**विविध सुविधाही होणार उपलब्ध**

**आज या ठिकाणी महाराष्ट्र शासनाच्या वतीने विकास साधताना देशातील पहिला धनुर्धारी राजांचा पुतळा उभारला जाणार आहे. या प्रकल्पासाठी तब्बल ५३ कोटींची तरतूद राज्य सरकारने केली असून पहिल्या टप्प्यात २५ कोटींच्या निधीला मंजुरी मिळाली असल्याचे रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी जाहीर केले आहे. त्याचप्रमाणे येथे साऊंड ॲण्ड लाईट, गार्डन तसेच राहण्याची व्यवस्था या प्रकल्पात असणार आहे.**

हे दोघे पेण व नागोठणे असे किनारपट्टीवर वसलेल्या बंदरांना लुटून जाळण्यासाठी तब्बल ३० हजारांची फौज घेऊन निघाले होते. लाल महालातून निघाल्यावर सह्याद्रीतील खडतर मार्गाने लोणावळ्याजवळील कुरवंड्या घाटातून ते कोकणातील तुंगारण्यात आले. खरंतर ते वाघासारख्या दबा धरून बसलेल्या मराठ्यांच्या पंजाखाली आले होते तिथेच त्यांची कोंडी झाली. एक हजार मावळ्यांच्या साथीने शिवरायांच्या आदेशाने सरसेनापती नेतोजी पालकरांनी इथे आधीच छावणी टाकली होती, जिथे आज चावणी गाव वसले आहे. एका बाजूने स्वतः महाराज तसेच मागच्या बाजूला महारुद्रासारखा उभा असलेला सह्याद्री आणि त्यातून वाट काढत खळखळणारी अंबानदी अशा चारही बाजूंच्या चिमटीत हे दोन सरदार आले आणि घमासान लढाई जुंपली.

एकही मावळा न गमावता ही लढाई आपण जिंकली आणि कोकण वाचले. अंबानदीने तो राजांचा पराक्रम पाहिलेला आहे. आजही इथली माती म्हणजे अंगारा समजला जातो, कारण राजांच्या पदस्पर्शाने ती पावन झालेली आहे. याच विचाराने प्रेरित होऊन राज्य सरकार ऐतिहासिक उंबरखिंड परिसराचे सुशोभीकरण करीत आहे. या परिसराच्या सुशोभिकरणासाठी कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी पाठपुरावा केला आहे.

# शहर स्वच्छतेसह समस्या मार्गी लावण्याची मागणी

## मुरूड पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाकडून नगर परिषदेला निवेदन



**मुरूड : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी भाविक आपल्या मूळ गावी येत असतात. या पार्श्वभूमीवर आपल्या शहरात स्वच्छता असावी व समस्यांचा त्रास गणेशभक्तांना होऊ नये याकरिता पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्या वतीने मुरूड नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांसाठी पालिकेत निवेदन देण्यात आले.

निवेदन देतेवेळी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर, देवेन सतविडकर, इम्यियाज शाबान, शैलेश वारेकर उपस्थित होते. त्यांनी मुख्याधिकाऱ्यांसाठी दिलेले निवेदन कार्यालयीन प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार यांनी स्वीकारले. सोबत वरिष्ठ लिपिक नरेंद्र नांदगावकर उपस्थित होते.

या निवेदनात नमूद केले आहे की, सालाबादप्रमाणे पारंपरिक गणेशोत्सव ७ ते १७ नोव्हेंबर या दरम्यान असणार आहे. त्यामुळे नगर परिषदेच्या वतीने मुरूड शहरातील परिसर रोजच्या रोज स्वच्छ करावा. प्रत्येक पाखाडीत गटारालगत वाढलेली झाडी तोडण्यात यावी. सिमेंट काँक्रीट रोडवर शेवाळ पकडलेली आहे त्यावर पावडर टाकावी. डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याने फवारणी करावी. समुद्रावर पर्यटकांची रेलचेल सुरू होणार आहे, मात्र समुद्रालगत बांधलेले गटार चोकअप झाल्याने तेथे दुर्गंधी पसरली आहे. त्यावर उपाय करावा तसेच समुद्र किनारी रस्त्यालगत गटाराचे बांधकाम चालू असल्याने रहदारीस अडथळा निर्माण होऊन त्या ठिकाणी एखादी दुर्घटना होऊन कोणाला दुखापत होऊ नये म्हणून गटार लाईनचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करावे. मुरूडमध्ये गुरांचा सुळसुळाट वाढलेला आहे त्याचा बंदोबस्त करावा. नगर परिषद हद्दीतील गटारावरील फुटलेली झाकणे काढून नवीन बसवण्यात यावी. अशा विविध समस्यांवर उपाय करून गणेशभक्तांना दिलासा द्यावा, अशी मागणी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्या वतीने पालिकेकडे करण्यात आली आहे.

# पेण रिक्षास्टॅण्ड काँक्रीटीकरणाचा शुभारंभ

**पेण : प्रतिनिधी**

पेण बसस्थानकाजवळ असणाऱ्या तीन चाकी रिक्षास्थानकाच्या काँक्रीटीकीकरणचा शुभारंभ रामेश्वरा कन्स्ट्रक्शनचे मालक राजू पीचिका आणि पेण पोलीस ठाण्याचे निरीक्षक संदीप बागुल यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. गेली अनेक वर्षे या रिक्षास्थानकाच्या जागेची दुरवस्था झाली होती आणि हे स्थानक खोलगट भागात असल्याने पावसाळ्यातील पाण्याचा निचरा होत नव्हता. त्यामुळे चालकांसह प्रवाशांना त्याचा त्रास सहन करावा लागत होता.



पेण बसस्थानकाच्या काँक्रीटीकरणाचे काम रामेश्वर कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून सुरू असताना रिक्षाचालकांनी आपल्या स्थानकातदेखील काँक्रीटीकरण करून देण्याची मागणी केली. यावर राजू पीचिका यांनी त्वरित त्यांची मागणी मान्य करून मोफत काँक्रीटीकरण करून दिले.

या कामाच्या शुभारंभावेळी रिक्षा चालक मालक संघटनेचे संघटक अजय पाटील, अध्यक्ष संतोष पाटील, उपाध्यक्ष योगेश म्हात्रे, कार्याध्यक्ष मोरेश्वर पाटील, खजिनदार शिवदास पाटील, सेक्रेटरी अनिल ठाकूर, सहसेक्रेटरी विलास कांबळे सल्लागार महेश पोरे, पांडुरंग पाटील, सुनील साळुंखे यांच्यासह रिक्षा चालक आणि मालक उपस्थित होते.

या वेळी उपस्थितांनी राजू पीचिका यांनी तत्परता दाखवून स्वखर्चाने काँक्रीटीकरण करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

# एसटी कर्मचाऱ्यांना पगारवाढ; भाजपकडून पेढे वाटून आनंद साजरा

**महाड** : एसटीच्या इतिहासात महायुती सरकारने एसटी कर्मचाऱ्यांच्या पगारात तब्बल ६,५०० रु. एवढी भरघोस वाढ केली आहे. यामुळे भाजपच्या वतीने गुरुवारी (दि.५) पेढे वाटून प्रवाशांसह हा आनंद साजरा करण्यात आला. गणपतीच्या सणाला एवढी चांगली भेट मिळाल्याने एसटीचा कर्मचारी आनंदी आहे. त्याचबरोबर प्रवासीही महायुतीच्या या निर्णयाने सुखावला आहे. महाड भाजपच्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष तथा प्रभारी तालुकाध्यक्ष जयवंत दळवी यांच्या नेतृत्वाखाली बसस्थानकात कर्मचारी व प्रवाशांना पेढे भरवून हा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी जिल्हा सदस्य संदीप ठोंबरे, महिला मोर्चा अध्यक्ष मंजुषा जोशी, युवा मोर्चाध्यक्ष सुमेध भोसले, महेश शिंदे, अनिल मोरे, चंद्रजित पालांडे, संगीता हर्डीकर, राष्ट्रवादीचे धीरज पाटील, वाहतूक अधीक्षक शिवाजी जाधव, एसटी कर्मचारी व प्रवासी उपस्थित होते.



## मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेच्या लाभार्थ्यांसाठी विशेष शिबिर

**पनवेल** : महापालिका कार्यक्षेत्रातील ६० वर्षांवरील नागरिकांना मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचा लाभ देण्याकरिता सोमवारी (दि.९) आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या ठिकाणी लाभार्थ्यांच्या नोंदणीसह वैद्यकीय प्रमाणपत्रासाठी आरोग्य तपासणीची सुविधादेखील देण्यात येणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणे आवश्यक, वय वर्षे ६० आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिक, लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाखांपेक्षा जास्त नसावे, योजनेच्या लाभासाठी ऑफलाईन अर्ज करावा लागेल, लाभार्थ्यांचे आधार कार्ड किंवा रेशनकार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, राज्यातील जन्मदाखला. (लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्याचे १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र/प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न २.५० लाखांपर्यंत असणं अनिवार्य) किंवा पिवळे/केशरी रेशनकार्ड असेण अनिवार्य आहे.


**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**कार्यकारी अभियंता, (विद्युत) यांचे कार्यालय**
**रायगड विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड,**
**सार्वजनिक बांधकाम आवार-पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन-४०२१०७**

Email: elraigad.ee@mahapwd.gov.in/elraigad.ee@gmail.com
Website: www.mahapwd.gov.in
दुरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८

**जा क्र. का.अ./राविवि/निविदा-१/ ३२९४ / सन २०२४** **दिनांक: ०५.०९.२०२४**

**ई-निविदा सुचना क्र. १२ सन २०२४-२५**

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८
२. महाराष्ट्र शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२२/प्र.क्र. १०४/इमा-२ दिनांक २८/०६/२०२४

**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर-पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन कोड-४०२१०७ दुरध्वनी क्र.०२१४३-२९९२८८** हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर-पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन कोड-४०२१०७ दुरध्वनी क्र.०२१४३-२९९२८८** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापुर्व बैठक / ठेकेदारांचा वर्ग /इसारा रक्कम / कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| | **Est. No. RAESD/ OW/126/2024-25** Providing 8 Passenger lift and Electrical installation to lift shaft for Proposed Building of PWD Division Panvel, Subdivision No.1, Subdivision No.2, subdivision Bhingari, at Bhingari, Tal- Panvel, Dist. Raigad. | रु. ११,९६,४०५/- | दिनांक १३.०९.२०२४ सकाळी ११:०० वाजेपासुन दिनांक २०.०९.२०२४ सायंकाळी १८:०० वाजेपर्यंत | **१) निविदापुर्व बैठक नाही.** २) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रु. १२०००/- ४) निविदा शुल्क रु. ५००/- अधीक १८% GST | दिनांक २३.०९.२०२४ सकाळी ११:०० |
| | **Est.No. RAESD/OW/120/2024-25** Providing Internal El, External El, Solar Roof top system, water pumps, DG set, CCTV system & Fire Alarm system at Rural Hospital Tala, Dist-Raigad. | रु. ७७,४२,२१२/- | दिनांक १३.०९.२०२४ सकाळी ११:०० वाजेपासुन दिनांक २०.०९.२०२४ सायंकाळी १८:०० वाजेपर्यंत | **१) निविदापुर्व बैठक नाही.** २) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. (३) इसारा रक्कम रु. ७७५००/- ४) निविदा शुल्क रु. ५००/- अधीक १८% GST | दिनांक २३.०९.२०२४ सकाळी ११:०० |

**खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
२. कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर-पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन कोड-४०२१०७ दुरध्वनी क्र.०२१४३-२९९२८८ या कार्यालयातील सुचना फलक
३. वरील कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पूर्ण केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. (अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र.। मध्ये जोडण्यात यावे.
४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहे.

**सही/**
**(सं.ध. कट्टी)**
**कार्यकारी अभियंता,**
**रायगड विद्युत विभाग,**
**सा.बां. पेण-रायगड**

**विमाका/ कोवी/ २०२४/२०२५/६१**
**दिनांक : ०५/०९/२०२४**



**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र. ४२७/४२८/२०२४ दि. ०६/०९/२०२४

**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| | Pyramid Developers, 2nd Floor, Munoth Landmark, Next to Garden Hotel, Old Panvel. | ०५ नारळ व ०३ अशोका अशा एकूण ०८ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील अंतिम प्लॉट नं. १२०, पनवेल येथे ०८ झाडे नविन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(स्वरूप खारगे)**
**सहा. आयुक्त (वृक्ष प्राधिकरण)**
**पनवेल महानगरपालिका**



**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र. ४२६/४२७/२०२४ दि. ०६/०९/२०२४

**आयुक्त पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निमशासकीय (Central Government, State Government, Government undertaking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार जाहीर ई-निविदा मागवीत आहेत.**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/१५४/२०२४-२०२५ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ खारघर नोड मधील विविध ठिकाणांवरील रस्ते दुरुस्ती करीता वार्षीक दराने काम करणे. (२ वर्षाकरीता, सन २०२४-२५ व २०२५-२६ करीता) | १६,४१,५७,४१५/- |
| २. | PMC/CE/१५२/२०२४-२०२५ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ब. कळंबोली नोड मधील रस्ते दुरुस्ती करीता वार्षीक दराने काम करणे. (२ वर्षाकरीता, सन २०२४-२५ व २०२५-२६ करीता) | ७,०२,१६,१२०/- |
| ३. | PMC/CE/१५१/२०२४-२०२५ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - क, कामोठे नोड मधील रस्ते दुरुस्ती करीता वार्षीक दराने काम करणे. (२ वर्षाकरीता, सन २०२४-२५ व २०२५-२६ करीता) | १०,५७,२४,८३५/- |
| ४. | PMC/CE/१४८/२०२४-२०२५ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ब व ड, नविन पनवेल (पूर्व व पश्चिम), काळुंद्रे नोड मधील रस्ते दुरुस्ती करीता वार्षीक दराने काम करणे. (२ वर्षाकरीता, सन २०२४-२५ व २०२५-२६ करीता) | १०,४५,१०,९६५/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दि. ०९/०९/२०२४** रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त I**
**पनवेल महानगरपालिका**

# प्रवीण कुमारची रेकॉर्डब्रेक उंच उडी

## पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत पटकावले सुवर्णपदक

**पॅरिस : वृत्तसंस्था**

भारतीय पॅरा ॲथलीट प्रवीण कुमारने पॅरिस पॅरालिम्पिकच्या पुरुषांच्या उंच उडी टी६४ स्पर्धेत आशियाई विक्रम मोडून सुवर्णपदक जिंकले. लहान पायांसह जन्मलेल्या प्रवीणने सहा खेळाडूंमध्ये हंगामातील सर्वोत्तम २.०८ मीटर उडी मारली आणि अव्वल स्थान पटकावले. भारताचे हे एकूण २६वे, तर सहावे सुवर्णपदक ठरले. यापूर्वी प्रवीणने टोकियो पॅरालिम्पिकमध्ये २.०७ मीटरच्या सर्वोत्तम प्रयत्नाने रौप्यपदक जिंकले होते.



उत्तर प्रदेशातील नोएडा येथील प्रवीण मरियप्पन (२१) हा पॅरालिम्पिकमध्ये पुरुषांच्या उंच उडीत सुवर्णपदक जिंकणारा थंगावेलू नंतरचा दुसरा भारतीय पॅरा ॲथलिट आहे. अमेरिकेच्या डेरेक लॉसेंटने २.०६ मीटरच्या उडीसह रौप्यपदक, तर उझबेकिस्तानच्या टेमेरबेक झियाझोव्हने २.०३ मीटरच्या उडीसह कांस्यपदक जिंकले. या कामगिरीसह प्रवीण कुमार पॅरिसमध्ये पदक जिंकणारा तिसरा भारतीय उंच उडीपटू ठरला. त्याच्या आधी शरद कुमारने रौप्यपदक जिंकले होते, तर मरियप्पनने पुरुषांच्या टी६३ स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते.

यासह पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताने आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली आहे. टोकियो पॅरालिम्पिक २०२०मध्ये भारताने पाच सुवर्ण, आठ रौप्य आणि सहा कांस्य अशी एकूण १९ पदकांसह ही भारताची पॅरालिम्पिक स्पर्धेतील सर्वोत्तम कामगिरी ठरली होती.

## निकेश कांबळेचे ॲथलेटिकमध्ये यश

**नवी मुंबई : बातमीदार**

सीवूड्स येथील डीएव्ही शाळेत शिकणाऱ्या निकेश कांबळे याने महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये झालेल्या राष्ट्रीय ॲथलेटिक स्पर्धेत यश मिळवले. निकेश याने २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सुवर्ण, तर ४०० मीटर रीले स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. याबद्दल निकेशचे सर्वत्र कौतुक होत असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## माणगावची जलतरणपटू ध्रुवी खाडेची 'सुवर्ण' हॅट्ट्रिक

■ मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील मुगवली येथील लीड स्कूलची जलतरणपटू विद्यार्थिनी ध्रुवी खाडे (इयत्ता सातवी) हिने जिल्हास्तरीय शालेय जलतरण स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून हॅट्ट्रिक साधली. यामुळे तिची मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

ध्रुवीने १४ वर्षांखालील मुलींच्या गटात ५० मीटर फ्रीस्टाइल, १०० मीटर फ्रीस्टाइल आणि ५० मीटर बटरफ्लाय स्ट्रोक या तीन प्रकारात सुवर्णपदक जिंकले, तर ध्रुवीचा लहान भाऊ अर्णव खाडे (इयत्ता सहावी) याने प्रथमच शालेय स्पर्धेत सहभाग घेत २०० मीटर फ्रीस्टाइल या जलतरण प्रकारात १४ वर्षांखालील मुलांमध्ये कांस्यपदक मिळवले. या दोघांना शालेय क्रीडाशिक्षक मंदार चौलकर, जलतरण प्रशिक्षक अभिनंदन दळवी यांचे मार्गदर्शन तसेच माणगावातील जलतरण तलावाचे व्यवस्थापक मंगेश निंबाळकर यांचे सहकार्य लाभले.








**पनवेल :** रयत शिक्षण संस्थेच्या खटाव (जि. सातारा) तालुक्यातील निढळ येथे हनुमान विद्यालयाची नूतनीकृत इमारत रायगडचे माजी खासदार आणि संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ लाख रुपयांच्या देणगीतून उभारण्यात आली आहे. या नूतनीकृत इमारतीचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते तसेच वर्गखोल्या, विविध कक्ष, ऑफिस यांचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह उपस्थित अन्य मान्यवरांच्या हस्ते झाले.

## जोश इंगलिसने ४३ चेंडूत झळकावले झंझावाती शतक

**इडनबर्ग :** ऑस्ट्रेलियाचा स्फोटक यष्टीरक्षक-फलंदाज जोश इंगलिसने स्कॉटलंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात अवघ्या ४३ चेंडूत शतक झळकावले. यासह तो आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये ऑस्ट्रेलियासाठी सर्वात जलद शतक झळकावणारा फलंदाज बनला. त्याने रॉन फिंच आणि ग्लेन मॅक्सवेल यांचा विक्रम मोडला, ज्यांनी प्रत्येकी ४७ चेंडूत शतके झळकावली होती. इंगलिसचे टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हे दुसरे शतक आहे. आता त्याने टी-२० इंटरनॅशनलमध्ये दोन किंवा अधिक शतके झळकावणाऱ्या फिंच आणि मॅक्सवेलच्या यादीत स्थान मिळवले आहे.














**सातारा :** रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नातू आणि संस्थेचे लाईफ मेंबर प्रा. अजित पाटील यांचे नुकतेच अल्पशा आजराने निधन झाले. संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गुरुवारी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख यांच्यासह पाटील कुटुंबिय उपस्थित होते.






## पराभवानंतर पाकिस्तान संघावर माजी खेळाडूंचा संताप

**कराची :** बांगलादेशविरुद्ध लागोपाठ दोन सामन्यांत पाकिस्तानचा पराभव झाल्यानंतर संघाला मोठ्या टीकेला सामोरे जावे लागत आहे. या पराभवानंतर संघाचा कर्णधार शान मसूदच नाही, तर संघ व्यवस्थापन आणि पीसीबीही आता ट्रोल होत आहेत.

माजी कर्णधार जावेद मियांदाद म्हणाला, आमचे क्रिकेट या स्तरावर पोहचले हे फारच त्रासदायक आहे. माजी कर्णधार इंझमाम उल हकने सांगितले की, तीन मालिका गमावणे आणि १० कसोटी सामन्यांमध्ये विजय मिळवता न येणे हे चिंताजनक आहे. युनूस खान म्हणाला की, जेव्हा एखादा संघ मानसिकदृष्ट्या पराभूत होण्याच्या मार्गावर जातो, तेव्हा त्यांना पुनरागमन करणे कठीण होते.